रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २७४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, २३ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
बालविवाहमुक्त अभियानात महाराष्ट्र देशात आघाडीवर/२
पळसदरी धरणात बुडालेल्या तरुणाचा मृतदेह सापडला/५
असीम मुल्ला मुरूड श्री किताबाचा मानकरी/८

## काँग्रेस अध्यक्ष खर्गेंना निवडणूक आयोगाची नोटीस

**चेन्नई :** तमिळनाडूतील प्रचार संपण्यासाठी अवघे काही तास उरले असतानाच काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी 'पंतप्रधान दहशतवादी आहेत', असा खळबळजनक आरोप केला. त्यामुळे खर्गे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. या प्रकरणी भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. त्यानुसार आयोगाने खर्गे यांना नोटीस पाठवली असून २४ तासांत याचा खुलासा करण्यास सांगितले आहे. तमिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने अण्णाद्रमुकशी युती केली आहे. त्यावरून चेन्नईतील पत्रकार परिषदेत खर्गे यांनी, 'अण्णाद्रमुकचे लोक त्यांच्या प्रचारफलकांवर अण्णादुराई यांचे छायाचित्र लावतात. मग पंतप्रधान नरेंद्र मोदींबरोबर कसे जाऊ शकतात? ते दहशतवादी आहेत', असे म्हटले होते. त्यानंतर मोदी दहशतवादी आहेत, असे मी म्हणालो नाही, अशी सारवासारवही त्यांनी केली, मात्र प्रकरण त्यांना भोवणार असल्याचे दिसते.



# राज्य मंत्रिमंडळाचे विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२२) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय झाले. या निर्णयांची माहिती शासनाच्या वतीने प्रसारमाध्यमांना देण्यात आली. या चार निर्णयांमुळे ग्रामीण क्षेत्राला सर्वाधिक लाभ होणार आहे.



शासनाने राज्यासाठीचे कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण अर्थात सीबीजी जाहीर केले आहे. मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब झाल्यानंतर हे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समिती स्थापन केली जाणार आहे. बायोगॅस प्रकल्प पीपीपी, हायब्रीड अन्युईटी तत्वावर राबवले जाणार आहेत. बायोगॅस धोरण राबवण्यासाठी राज्य शासनाने यंदाच्या वर्षी पाचशे कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे. घनकचऱ्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन करणे आणि हरित गृह वायू उत्सर्जन कमी करणे यासाठी बायोगॅस धोरण लाभदायी ठरणार आहे.

राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. लाभार्थी शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्त गुण मिळणार आहेत.

सातारा जिल्ह्यातील मौजे नागेवाडी येथे आयटी पार्कला जमीन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ४२.५५ हेक्टर जमीन देण्यात येणार आहे. आयटी पार्कमुळे सातारा जिल्हा आणि परिसरातील आयटी क्षेत्राला प्रोत्साहन मिळणार आहे. स्थानिक युवकांना रोजगार-व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार भोगवटादार वर्ग २मधून भोगवटादार वर्ग १मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना करण्यासाठी अधिसूचना काढण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. महसूल खात्यांतर्गत हा निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या या चार निर्णयांमुळे विविध घटकांना फायदा मिळणार आहे.

### पनवेलमध्ये युवाशक्ती जागर यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

# भाजयुमोचे मजबूत संघटन उभे करूया

■ प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे तरुणाईला आवाहन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित युवाशक्ती जागर यात्रेच्या निमित्ताने मंगळवारी (दि.२१) पनवेलमध्ये तरुणाईचा उदंड उत्साह पहायला मिळाला. या यात्रेचे नेतृत्व करत असलेले भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी मार्केट यार्ड येथील बैठकीत बोलताना आपण सर्वांनी मिळून युवा मोर्चाचे एक मजबूत संघटन उभे करूया, असे आवाहन केले.

युवाशक्ती जागर यात्रेला उत्तर रायगडमधील युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभल्याने पनवेलमध्ये भाजपची मोठी ताकद दिसून आली. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक अजय बहिरा, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, शहर उपाध्यक्ष केदार भगत, अमित ओझे, तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, रोहित जगताप, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष हिमेश बहिरा, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष मयूर कदम, निखील जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यकर्त्यांशी संवाद साधताना युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी अतिशय नम्र भूमिका घेत सांगितले की, मी आज प्रदेशाध्यक्ष असलो तरी तुमच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करणार आहे. मला तुमच्याकडूनही खूप काही शिकायचे आहे. तरुणांनी विविध क्षेत्रांत काम करण्याचे धाडस दाखवले पाहिजे. त्यासाठी मी तुमच्यासोबत प्रदेशाध्यक्ष म्हणून नाही, तर एक मित्र म्हणून सदैव पाठीशी उभा राहीन.

यावेळी प्रदेशाध्यक्ष महाडिक यांनी ठाकूर कुटुंबियांच्या कार्याचा गौरव केला. 'ठाकूर परिवाराने प्रगत आणि पावन केलेली भूमी म्हणजे पनवेल आहे,' अशा शब्दांत त्यांनी आपला आदर व्यक्त केला.

प्रारंभी युवाशक्ती जागर यात्रा जेव्हा पनवेलमध्ये दाखल झाली, तेव्हा गार्डन हॉटेलपासून काढण्यात आलेल्या एका भव्य बाईक रॅलीने स्वागत करण्यात आले. या रॅलीत शेकडो तरुण उत्साहाने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा विशेष संवाद मेळावा पार पडला. यामध्ये आगामी काळातील संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या दौऱ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे वडाळे तलाव येथे आयोजित केलेला 'मीट-अप विथ के.एम.' हा कार्यक्रम. या विशेष सत्रात प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी तरुण पिढी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससोबत थेट संवाद साधला, ज्यामुळे तरुणांमध्ये एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली. संपूर्ण जागर यात्रेच्या माध्यमातून युवकांना संघटित करून त्यांच्यामध्ये नवीन राजकीय आणि सामाजिक चेतना निर्माण करण्याचा प्रयत्न भारतीय जनता युवा मोर्चाकडून यशस्वीपणे करण्यात आला.

## थोर समाजसुधारक जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

### आज नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठक गुरुवारी (दि. २३) आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सायंकाळी ५ वाजता उलवे नोड सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे.



जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. संबंधितांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## कल्पना खरातचा जामीन अर्ज फेटाळला

**राहता :** नाशिकमधील महिलांच्या शोषणप्रकरणी अटकेत असलेला भोंदूबाबा अशोक खरात याची पत्नी कल्पना खरातचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

कल्पनाविरुद्धही शिर्डी पोलिसांत एका शेतकऱ्याच्या जमीन फसवणूक प्रकरणात गुन्हा दाखल असून सध्या ती फरार आहे. अटकपूर्व जामिनासाठी तिच्या वतीने राहता येथील न्यायालयात अर्ज करण्यात आला होता, जो बुधवारी (दि.२२) युक्तिवादानंतर फेटाळण्यात आला.

## निवडक

### अमेरिकन महिलेवर कर्नाटकातील होमस्टेमध्ये अत्याचार; दोघांना अटक

**बंगळुरू :** अमेरिकेतील एका पर्यटक महिलेवर कर्नाटकच्या कोडगू जिल्ह्यात कुट्टा परिसरातील होमस्टेमध्ये कर्मचाऱ्याने शीतपेयातून गुंगीचे औषध देऊन लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. गंभीर बाब म्हणजे कर्मचाऱ्याने केलेला गुन्हा लपवण्यासाठी मालकाने तीन दिवस होमस्टेचे इंटरनेट बंद केले तसेच पीडित महिलेला या काळात डांबून ठेवले होते. या प्रकरणी कर्मचारी व मालकाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्या दोघांना अटक करण्यात आली आहे.

### होर्मुझ सामुद्रधुनीत तीन व्यापारी जहाजांवर इराणचा गोळीबार

**तेहराण :** जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीत पुन्हा एकदा तणाव पसरला आहे. इराणी सैन्याने आंतरराष्ट्रीय जलसीमेतून जात असलेल्या तीन व्यापारी जहाजांवर बुधवारी (दि.२२) अंधाधुंद गोळीबार केला, त्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावरचे संकट अधिक गडद झाले आहे. हा हल्ला अशा वेळी झाला, जेव्हा अमेरिका आणि इस्रायलसोबत इराणच्या शांतता चर्चेसाठी प्रयत्न सुरू होते.





**इंदौर (मध्य प्रदेश) : पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत वक्ता प्रशिक्षण कार्यशाळा स्व. कुशाभाऊ ठाकरे सभागृहात बुधवारी आयोजित करण्यात आली होती. यासाठी महाराष्ट्रातून भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य विनय सहस्त्रबुद्धे, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ, भाजप प्रदेश उपाध्यक्ष आमदार गोपीचंद पडळकर, सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, राजेश पांडे, माधवी नाईक, सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.**

## भारत दहशतवादासमोर झुकणार नाही!

### पहलगाम हल्ला वर्षपूर्तीला पीएम मोदींचा शत्रूंना स्पष्ट संदेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला २२ एप्रिल रोजी एक वर्ष पूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर एक पोस्ट करत भारत कोणत्याही स्वरूपाच्या दहशतवादासमोर कधीही झुकणार नाही आणि दहशतवाद्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत, अशा स्पष्ट शब्दांत शत्रूंना संदेश दिला आहे.

गेल्या वर्षी याच दिवशी पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात नाहक बळी ठरलेल्या निष्पाप जीवांचे स्मरण करत आहोत. त्यांना कधीही विसरले जाणार नाही. या दुःखाचा सामना करत असलेल्या शोकाकुल कुटुंबांच्या दुःखातही सहभागी आहे. एक राष्ट्र म्हणून आम्ही या शोकाच्या प्रसंगी आणि आमच्या निर्धारात एकजूट होऊन उभे आहोत, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

दरम्यान, काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या नरसंहारामुळे तेथील ओस पडलेली पर्यटनस्थळे पुन्हा पर्यटकांनी गजबजली आहेत. पहलगाममध्येही त्यांची रीघ लागली आहे. अस्थिरता माजविण्याचा प्रयत्न



करणाऱ्या पाकला भारतीयांनी लगावलेली ही सणसणीत चपराक आहे.

पर्यटकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी जम्मू-काश्मीरमधील सरकार, अधिकाऱ्यांनी सुरक्षा यंत्रणा आणि नागरिकांच्या मदतीने गेल्या वर्षभरात मोठे प्रयत्न केले आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले असून भारतासह जगभरातून पर्यटक पुन्हा काश्मीरमध्ये येच आहेत. गेल्या महिन्यात देशभरातून ३.८ लाखांहून अधिक पर्यटकांनी श्रीनगरमधील प्रसिद्ध इंदिरा गांधी मेमोरियल ट्युलिप गार्डनला भेट दिली. पहलगाम हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या २६ जणांची नावे कोरलेले एक स्मारक तेथील नदीकाठी उभारण्यात आले असून तिथे आता पर्यटक थांबून येथे श्रद्धांजली अर्पण करतात.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर दोन दिवसांचा ब्लॉक



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील किमी क्र. ५८/५०० (डोंगरगाव/कुसगाव) येथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)मार्फत बांधण्यात आलेल्या पुलाचे शटरिंग काढणे व रंगकाम करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी द्रुतगती मार्गावरील वाहतूक दोन दिवस काही वेळेसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

एक्सप्रेस वेवरील मुंबईकडे जाणारी वाहतूक २३ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असून ही वाहने किवळे-देहूरोड-तळेगावमार्गे राष्ट्रीय महामार्ग ४८वरून कुसगाव टोल प्लाझा येथे वळविण्यात येतील. त्याचप्रमाणे पुण्याकडे येणारी वाहतूक २४ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असून सर्व वाहने कुसगाव टोल प्लाझामार्गे राष्ट्रीय महामार्ग ४८वरून देहू रोड किवळेमार्गे पुण्याकडे वळविण्यात येतील. या पार्श्वभूमीवर वाहनचालकांनी प्रवासाचे योग्य नियोजन करावे व दिलेल्या कालावधीत पर्यायी मार्गांचा वापर करावा. या कालावधीत द्रुतगती मार्गावरील वाहनचालकांना कोणतीही अडचण आल्यास त्यांनी मदतीसाठी नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ९८२२४९८२२४ किंवा महामार्ग पोलीस विभागाच्या ९८३३४९८३३४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन एमएसआरडीसीने केले आहे.

## आरोपी अयानची पोलिसांकडून धिंड

**अमरावती : प्रतिनिधी**

परतवाडा येथील मुलींचे लैंगिक शोषण आणि त्यांचे अश्लील व्हिडीओ बनवण्याच्या प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याची पोलिसांनी बुधवारी (दि.२२) अचलपूर शहरात भररस्त्यातून धिंड काढली.

तपासाचा एक भाग आणि गुन्हेगारांच्या मनात भीती निर्माण व्हावी या उद्देशाने पोलिसांनी सरमसपुरा पोलीस ठाण्यापासून ते अयानच्या घरापर्यंत त्याला पायी चालत नेले असल्याची चर्चा रंगली आहे. यावेळी आरोपी अयानला धड चालताही येत नव्हते. उतरलेला चेहरा आणि मान खाली घालून लंगडत चालत असताना तो दिसला. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# रायगडात ३८५ रुग्णांना सुमारे ३.३५ कोटींची मदत

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. रायगड जिल्ह्यात आर्थिक वर्षात ३८५ रुग्णांना सुमारे तीन कोटी ३५ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रुग्णालय, धर्मादाय रुग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून



दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

### २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य

कॉक्लियर इम्प्लांट (वय दोन ते सहा), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/ रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

### रुग्णांना आधार!

- *१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी सहा लाख ८१ हजार ५०० रुपयांची, तर रायगड जिल्ह्यातील ३८५ रुग्णांना सुमारे तीन कोटी ३५ लाख ३३ हजार रुपयांची मदत देण्यात आली.*
- *मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहचत आहे.*
- *अधिक माहिती व सहाय्यासाठी रुग्णांनी १८००१२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.*

# बालविवाहमुक्त अभियानात महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर ३२ बालविवाह रोखले | मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभागाने 'स्पेशल फोर्स'च्या माध्यमातून मोठी कारवाई करत एकाच दिवशी तब्बल ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळवले असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार १८ वर्षांखालील मुलगी व २१ वर्षांखालील मुलाचा विवाह लावणे हा दंडनीय गुन्हा असून, बाल विवाह मुक्त राज्य बनविण्यासाठी महिला व बालविकास विभाग बाल विवाह मुक्त भारत हे अभियान राबवित असून, अतिशय कडक कारवाई करत राज्य देशात आघाडीवर आहे.

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर काही भागांत पारंपरिक पद्धतीने अल्पवयीन बालकांचे विवाह लावण्याची प्रथा अद्यापही आढळून येते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने "बाल विवाह मुक्त भारत" या १०० दिवसांच्या अभियानांतर्गत व्यापक जनजागृती, समन्वय आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून यंत्रणा अधिक सजग केली आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, प्रकरण व्यवस्थापन, कुटुंबाचा सातत्याने पाठपुरावा, तसेच शिक्षण, कौशल्य विकास, समुपदेशन आणि पोषण सेवांशी समन्वय साधण्याचे काम या अभियानामार्फत राबविण्यात आले होते. यामध्ये कोकण विभाग (रायगड) २ बालविवाह, पुणे विभाग (पालघर) १, नाशिक विभाग सांगली (१), नाशिक (२), अहिल्यानगर (५), छत्रपती संभाजीनगर विभाग परभणी (१), लातूर (१), बीड (३), हिंगोली (१), धाराशिव (२), संभाजीनगर (४), बुलडाणा (१), अमरावती विभाग अकोला (४), नागपूर विभाग यवतमाळ (२), चंद्रपूर (२) असे एकूण ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळाले.

बालविवाह हा केवळ कायद्याचा भंग नसून बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. बालविवाह रोखण्याबरोबरच संबंधित बालिकांच्या पुनर्वसन, शिक्षण आणि संरक्षणासाठीही ठोस पावले विभागामार्फत उचलली जात आहेत. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालक व मध्यस्थांवर कारवाई सुरू असून, यापुढेही अशा घटना घडू नये यासाठी कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.


या अभियानाच्या अनुषंगाने विभाग व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत जिल्हाधिकारी, तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच राज्यातील सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी आणि चाइल्ड हेल्पलाइन प्रतिनिधी सहभागी झाले होते.

# सिडको नवी मुंबईमध्ये एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क विकसित करणार

## जागतिक व्यापाराच्या वाढीला मिळणार चालना

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतामधील लॉजिस्टिक्स क्षेत्र ई-कॉमर्स, उत्पादन आणि जागतिक व्यापाराच्या वाढीमुळे वेगाने विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर, नवी मुंबई एक प्रमुख लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून पुढे येत आहे अनेक वर्षांची संकल्पना आता प्रत्यक्षात आकार घेत आहे.




जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसोबत असलेले सान्निध्य तसेच मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, प्रस्तावित मल्टी-मोडल कॉरिडॉर तसेच डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर यांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांमुळे लाभलेल्या उत्कृष्ट कनेक्टिव्हिटीमुळे नवी मुंबई एक प्रमुख लॉजिस्टिक्स हब म्हणून उदयास येत आहे.

या धोरणात्मक संधीचा लाभ घेण्यासाठी सिडकोने पुष्पक नोडमधील चिर्ले गावाजवळ सुमारे ३७४ हेक्टर जमीन एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क (आयएलपी) विकसित करण्यासाठी राखीव ठेवली आहे. या प्रकल्पांतर्गत विकसित होणाऱ्या क्षेत्रावर आवश्यक पायाभूत सुविधा, सामाजिक सुविधा, सामायिक सुविधा आणि उपयुक्तता जाळ्यांचा समावेश असेल.

या प्रकल्पासाठी जमीन वाटप, विकास आणि वितरण हे महाराष्ट्र शासनाच्या एमआयडीसी पास-थ्रू धोरणानुसार करण्यात येणार आहे. यासाठी सविस्तर मास्टर प्लॅन तयार करण्यात आला असून संपूर्ण क्षेत्र सात लॉजिस्टिक्स झोनमध्ये विभागण्यात आले आहे. सर्व भूखंडांना सुलभ जोडणी मिळावी यासाठी ४५ मीटर आणि ३० मीटर रुंदीच्या रस्त्यांचे प्राथमिक जाळे प्रस्तावित करण्यात आले आहे.

प्राथमिक टप्प्यात, सिडकोने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे लँड पार्सल एल-१ मधील सुमारे ७२ हेक्टर (१७९.२९ एकर) क्षेत्रातील १२ भूखंडांसाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) आमंत्रित केली आहे. या प्रकल्पासाठी रस्ते, पाणीपुरवठा व्यवस्था, मलनिस्सारण जाळे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा यांसारख्या मूलभूत पायाभूत सुविधा सिडकोकडून विकसित करण्यात येतील.

निवड प्रक्रियेनंतर, यशस्वी अर्जदार आणि सिडको यांमध्ये सामंजस्य करार (एमओयू) करण्यात येईल, ज्यामध्ये संबंधित भूखंडाच्या शुल्क भरणा आणि अधिग्रहणासंबंधी अटी नमूद असतील. महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण आणि त्यातील पुढील अद्ययावतीकरणांनुसार या प्रकल्पांतर्गत लॉजिस्टिक्स आणि संबंधित लाइट इंडस्ट्रीज, वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स पार्क, कंटेनर फ्रेट स्टेशन, इनलँड कंटेनर डेपो आणि इतर पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील.

> **एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्कच्या विकासाद्वारे सिडको कार्यक्षम मालवाहतूक सुलभ करणारी, गुंतवणूक आकर्षित करणारी आणि आर्थिक विकासाला चालना देणारी भविष्याभिमुख परिसंस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्राथमिक टप्पा हा या क्षमतेला चालना देत नवी मुंबईला राष्ट्रीय स्तरावरील लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.**
> **-विजय सिंघल,**
> उपाध्यक्ष, सिडको

हा उपक्रम नवी मुंबईला राष्ट्रीय स्तरावरील लॉजिस्टीक पार्क म्हणून अधिक बळकटी देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत असून कार्यक्षम, एकात्मिक आणि भविष्याभिमुख मालवाहतूक पायाभूत सुविधा विकसित करण्यास चालना देणारा आहे. यासोबतच, सिडकोतर्फे एज्युकेशन सिटी, मेडिसिटी, स्पोर्ट्स सिटी आणि एंटरटेनमेंट अरेना यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक पायाभूत प्रकल्पांची उभारणी करण्यात येत असून त्यामुळे या प्रदेशाचा एकूण विकास अधिक सक्षम होणार आहे.

# रोहा नगर परिषदेतर्फे हंगामी भाजी, फळ विक्रेत्यांची बसण्याची व्यवस्था

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरातील आडवी बाजारपेठ, तीन बत्ती नाका ते राम मारुती चौक व अन्य ठिकाणी रस्त्यावर हंगामी भाजी पाला विक्रेते व फळ विक्रेते बसत असल्याने वाहतुकीस अडथळा होत होता.

याचबरोबर भाजीपाला विक्रेते व फळ विक्रेत्यांचे सुरक्षिततेचाही प्रश्न होता. यांची दखल घेत रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने हंगामी भाजी व फळ विक्रेत्यांना नियोजित (भाजी मार्केट आरक्षण क्रमांक २१) या विशिष्ट जागेत स्थलांतरित करण्यात आले आहे. या ठिकाणी तात्पुरती शेड व पीसीसीची व्यवस्था करण्यात आली असून, येणाऱ्या काळात आवश्यक त्या सर्व सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून



देण्यात येईल, असे नगर परिषदेच्या वतीने सांगत आले.

रोहा शहरात स्थानिक हंगामी भाजी विक्रेते व फळ विक्रेते रस्त्यांच्या कडेला बसणाऱ्या विक्रेत्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच ग्राहकांनाही सर्व भाजीपाला व फळे एका ठिकाणी सहज उपलब्ध होतील.

येत्या काळात खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली, ना. आदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वाखाली आणि विशेष प्रयत्नांतून येथे एक सुसज्ज भाजी मार्केट उभारण्यात येणार आहे. त्या दृष्टीने आवश्यक प्रयत्नही सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिली आहे.

दरम्यान, भाजीविक्रेते व फळ विक्रेत्यांनी नगराध्यक्ष वनश्री शेडगे व मुख्याधिकारी अजयकुमार एडके, नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह नगर परिषदेचे आभार मानले आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्षांकडून विविध नियुक्त्या जाहीर

**कळंबोली : बातमीदार**

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजपा महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते आणि विभागीय प्रसिद्धी प्रमुखांच्या नावांची घोषणा केली आहे. या पदाधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे एका लेखी पत्रानुसार घोषित केलेली आहेत.

महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदी विश्वास पाठक, प्रमोद जठार, अजित चव्हाण, अवधूत वाघ, गणेश खणकर, श्वेता शालिनी, शिवराय कुलकर्णी, राम कुलकर्णी, अतुल शाह, विनोद वाघ, गणेश हाके, कुणाल टिळक, विनायक आंबेकर, राजीव पांडे, पंकज मोदी, श्री. असिफ भामला, जितेन गजारिया, प्रमोद राठोड, प्रिती गांधी, शिवानी दाणी, अजय पाठक, लक्ष्मण सावजी, समीर बाकरे यांचा समावेश करण्यात आला आहे. तर


विभागीय प्रसिद्धी प्रमुख कोकण - सतिश धारप, ठाणे दिपेश म्हात्रे, पालघर समीर पाटील, पूर्व विदर्भ कल्पना नालस्कर, पश्चिम विदर्भ अन्नु शर्मा, उत्तर महाराष्ट्र गोविंद बोरसे, पश्चिम महाराष्ट्र संजय मयेकर यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# राजिपच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी डॉ. रूपाली सातपुते

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ. रुपाली सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजिपचे तत्कालिन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांची पुणे येथे दिव्यांग कल्याण विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या जागी राजिपच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे या प्रभारी म्हणून काम पाहात होत्या.

डॉ. रुपाली सातपुते यांनी यापूर्वी पालघर जिल्ह्यातील कुपोषण नियंत्रण, तसेच विकसित



भारत संकल्प यात्रा यांसारख्या महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावली आहे. आता त्यांची रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी बुधवारी रायगड जिल्हा परिषद येथे प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांच्याकडून पदभार स्विकारला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे यांनी त्यांचे स्वागत केले.

# राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्ष रहाटकर यांच्याकडून कोकण विभागाचा आढावा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

'राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी नवी मुंबई येथे कोकण विभागाचा सर्वंकष आढावा घेतला.

राष्ट्रीय महिला आयोग (NCW) ही भारतातील महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणारी आणि त्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेली महत्त्वाची वैधानिक संस्था असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

यावेळी राष्ट्रीय महिला आयोग अतिरिक्त सचिव राधिका चक्रवर्ती, राज्य महिला आयोगाचा सदस्य सचिव नंदिनी आवडे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, तर दूरदृश्यप्रणालीद्वारे रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पालघर जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड, रत्नागिरी



जिल्हाधिकारी मनोज जिंदल, कोकण विभागातील सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी, महानगरपालिका आयुक्त, विधी प्राधिकरण अधिकारी, पोलीस अधीक्षक, महिला व बालविकास उपायुक्त सुवर्णा पवार, सामान्य प्रशासन उपायुक्त रविंद्र पवार, महिला व बालविकास अधिकारी, संबंधित विविध विभागांचे अधिकारी तसेच संबंधित तक्रारदार महिला उपस्थित होत्या.

यावेळी त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे केंद्र व राज्य शासनाच्या महिलाकेंद्रित योजनांचा आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना, हर घर जल योजना, बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ, लखपती दीदी योजना यांसारख्या योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचे त्वरित निराकरण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विभागाकडून प्राप्त होणारा फीडबॅक आयोग केंद्र सरकारला सादर करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय गुन्हे नोंदवहीच्या (NCRB) आकडेवारीनुसार, महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र राज्य आघाडीवर असल्याचे निदर्शनास आणून देत त्यांनी चिंता व्यक्त केली. वाढत्या शहरीकरणामुळे आणि लोकसंख्येमुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असली, तरी सर्व यंत्रणांनी अधिक प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

महिलांच्या तक्रारींचे निवारण जलद गतीने व्हावे, यासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांनी आठवड्यातून किमान एक दिवस आणि ठराविक वेळ महिलांसाठी राखून ठेवावी. या राखीव वेळेत महिलांना थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आपली कैफियत मांडता येईल, ज्यामुळे प्रलंबित तक्रारींचे त्वरित निराकरण होईल. जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध असलेले संरक्षण अधिकारी, स्थानिक समित्या, 'वन स्टॉप सेंटर' आणि पोलीस विभाग यांनी समन्वयाने काम करावे. जिल्हाधिकारी व पोलीस प्रमुखांनी नियमित संयुक्त बैठका घेऊन प्रकरणांचा आढावा घ्यावा तसेच गरजू महिलांना विनामूल्य कायदेशीर मदत आणि समुपदेशन सेवा वेळेत उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये महिलांच्या तक्रारींसाठी असलेल्या 'अंतर्गत समिती' (Internal Committee) आणि 'स्थानिक समिती' (Local Committee) प्रत्यक्ष कार्यरत आहेत की नाहीत, याची खात्री करण्याचे आदेश त्यांनी दिले.

या दौऱ्यादरम्यान आयोजित जनसुनावणीत अनेक प्रकरणांवर प्रत्यक्ष सुनावणी घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे आदेश देण्यात आले.

# तळा शहरात रानमेवा दाखल

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरात डोंगरचा रानमेवा दाखल झाला असून त्यास नागरिकांची पसंती आहे. एप्रिल महिना सुरू झाला की बाजारात कैऱ्या, जांभळे, कोकमाची इत्यादीची आवक बाजारात वाढली आहे. हा डोंगरचा रानमेवा आदिवासी समाज अधिक प्रमाणात आणत आहे.

या रानमेव्याचा एक वाटा २० ते ३० रूपयांना मिळत आहे. यापुर्वी हाच रानमेवा मोठ्या प्रमाणात बाजारात येत होता.आता मात्र यांचे प्रमाण कमी झाले आहे. काही रानमेव्याचे प्रकार तर आता येतच नाही असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या दिवसात बाजारात येणाऱ्या या रानमेव्यामुळे आदिवासी समाजाला एक व्यवसायाचे दोन महिन्यांसाठीचे साधन झाले आहे. यातून आर्थिक लाभ होत आहे. डोंगरचा रानमेवा हा आरोग्यासाठी चांगले असून त्यांच्यामध्ये औषधी गुणधर्म असल्याने ही डोंगराची फळे खाणे आवश्यक आहे. तालुक्यातील अनेक डोंगरी भाग हा धनदांडग्यानी विकत घेतला असून त्या ठीकाणी सिमेंटची जंगले उभी राहताना दिसत आहेत. ही जंगले वाचविण्याचीही गरज असल्याचे तज्ञांकडून बोलले जात आहे.



# बळीराज सेनेचा वर्धापन दिन सोहळा




**पनवेल : वार्ताहर**

बळीराज सेना या राजकीय पक्षाचा ३ रा वर्धापन दिन सोहळा दादर येथील देवराज हॉल येथे अक्षय तृतीयेच्या पवित्र दिनी मोठ्या उत्साहात पार पडला. सर्वप्रथम बळीराज सेना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक दादा वालम यांचे औक्षण करण्यात आले. बळीराज सेना पक्षाचे दिवंगत नेते निसर्गवासी नंदकुमार मोहिते आणि निसर्गवासी कृष्णा कोबनाक यांना पुष्पहार अर्पण करुन त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

अध्यक्ष तसेच मान्यवरांचा सत्कार करुन, डिजिटल मिडीया प्रमुख दिनेश हरड व त्यांच्या टिमने तयार केलेलं पक्ष संघटन आणि कार्यकर्ता सक्षमीकरण यांचे प्रेझेंटेंशन ॲड. विनेश वालम यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. प्रेझेंटेशनमध्ये बळीराज सेना पक्षाने आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा आणि पुढील राजकीय यशस्वी वाटचालीसाठी तयार केलेला रोडमॅप दाखविण्यात आला. भविष्यकाळात आपल्या पक्षाने कोणती कार्ये केली पाहिजेत यांचे नियोजन सर्व कार्यकर्त्यांना समजावून सांगितले.

त्यानंतर बळीराज सेनेचे कार्यकर्ते असलेले विविध विभागातील पदाधिकारी शहापूरचे दशरथ भोईर, अंधेरीचे संतोष चव्हाण, नाणार रिफायनरी विरोधक मानसी धनावडे यांनी आपले अनुभव सर्वांसमोर कथन केले.

पत्रकार शरद मोरे व डिजिटल मिडीया प्रमुख दिनेश हरड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम सर्वोतोपरी यशस्वी करण्यासाठी युवा नेतृत्व ॲड. विनेश वालम यांच्या कुशल नेतृत्वाखाली मनोहर पवार, मनोहर डोंगरे, विजय मांडवकर, अनिल मोंडे, संतोष टक्के आणि सहकारी यांनी बहुमोल सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पक्षाचे सरचिटणीस संभाजी काजरेकर यांनी यशस्वीरित्या सर्व कार्यक्रमाची रुपरेषा मुद्देसुद मांडून वेळेचे नियोजन करुन पार पाडले. सांगता बळीराज सेना युवती अध्यक्षा स्वरा चोगले यांनी केले.

# रेवदंडा किल्ल्यावर विद्यार्थ्यांचा स्वच्छता अभियानाचा आदर्श उपक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसा जपण्याच्या दृष्टीने जिंदल विद्या मंदिर, साळाव येथील विद्यार्थ्यांनी रेवदंडा किल्ल्यावर स्वच्छता अभियान राबवून एक प्रेरणादायी आदर्श घालून दिला. इयत्ता ९वी 'अ' च्या ३१ विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्याच्या परिसराची स्वच्छता करून त्याचे सौंदर्य पुनर्स्थापित करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला.

या उपक्रमात शिक्षिका अफी बाशा आणि सुशील अभंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेचे शिपाई राकेश पाटील यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी किल्ल्याभोवती साचलेला कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला आणि "स्वच्छता हीच सेवा" हा संदेश प्रभावीपणे दिला.

शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर आणि उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी अशा सामाजिक व ऐतिहासिक जतनाच्या उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच JET प्रमुख डॉ. भावेश भालेराव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, "इतिहासाचे जतन हे केवळ शासनाचे नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

या स्वच्छता मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारशाबद्दल जाणीव निर्माण झाली असून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वही त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून अनुभवले. जिंदल विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी यावेळी किल्ल्याच्या परिसरातील स्वच्छता करून किल्ल्यावरील झाडे झुडपे, सुकी पाने, प्लास्टिक बॉटल, प्लास्टिक पिशव्या आदी वस्तू एकत्र करून त्याची योग्य ती विल्हेवाट करण्यात आली.



## संपादकीय

# विकासाची नवी कहाणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली डेटा सेंटर्स क्षेत्राचा विकास करण्यासाठी ज्या वेगाने काम सुरु आहे, ते पाहता नवी मुंबई ही भारताची 'डिजिटल राजधानी' बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे असेच म्हणावे लागेल. आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे प्रकल्प आल्यामुळे नवी मुंबईचा परिसर डेटा सेंटरच्या जागतिक नकाशावर महत्वाच्या स्थानी येण्यास सुरुवात झाली आहे.

**डिजिटल युगाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेस 'डेटा सेंटर' नावाचा एक मजबूत कणा मिळाला आहे. देशातील कोट्यवधी लोक दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या समाजमाध्यमे, व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म्स, बँकिंग सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध सरकारी ऑनलाइन सेवा यांचा अफाट डेटा साठवून ठेवणाऱ्या या क्रांतीच्या पाऊलखुणा आता महाराष्ट्रात फडणवीस सरकारच्या प्रयत्नांमुळे दिसू लागल्या असून नवी मुंबई परिसराची मोहोर त्यावर उमटली आहे. नवी मुंबई हे क्षेत्र आता भारतातील डेटा सेंटर्सचे प्रमुख केंद्र म्हणून उदयाला येत आहे. भारताच्या एकूण डेटा सेंटर क्षमतेपैकी ५० ते ६० टक्के हिस्सा एकट्या महाराष्ट्रात आणि विशेषतः नवी मुंबई परिसरात एकवटलेला आहे. 'डेटा सेंटर डायनॅमिक्स'च्या गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, 'अमेझॉन वेब सर्व्हिसेस'ने तळोजा जवळील आसोडे आणि बुर्डुल या गावांच्या सीमेवर सुमारे चार हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा प्रकल्प उभारण्यास मंजुरी मिळावी यासाठी अर्ज केला आहे. तळोजाजवळ सहा भव्य इमारतींमध्ये उभ्या राहणाऱ्या या संकल्पित प्रकल्पात सहा भव्य इमारती असणार आहेत. याशिवाय नवी मुंबई परिसरात याच क्षेत्रातील आणखीही काही कंपन्या येऊ घातल्याने या क्षेत्राचे आर्थिक, सामाजिक भविष्य उजळण्यास सुरुवात झाली आहे. डेटा हबच्या जागतिक नकाशावर या क्षेत्रास मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या फडणवीस सरकारने या क्षेत्राच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याने जागतिक स्तरावरील नामांकित कंपन्यांना महाराष्ट्रात आकर्षित करण्यासाठी राज्याची प्रशासकीय यंत्रणादेखील सज्ज झाल्याने, महाराष्ट्रात निर्माण झालेल्या अनुकूल वातावरणाचे स्वागत करावयास हवे. सध्या भारतात १६०हून अधिक डेटा सेंटर्स कार्यरत आहेत. येत्या पाच वर्षांत या क्षेत्रातील भारताची बाजारपेठ २२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे, आणि सहाजिकच त्यामुळे नव्या युगाची गरज असलेल्या रोजगाराच्या असंख्य संधीदेखील या क्षेत्राभोवती एकवटणार आहेत. अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई गोवा हायवे यासारख्या रस्त्यांमुळे हा परिसर मुंबई आणि महाराष्ट्रातील तसेच शेजारच्या राज्यांशी उत्तम प्रकारे जोडला गेला आहे. याशिवाय, मुंबई-पुणे-नाशिक या सुवर्ण त्रिकोणातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक कंपन्यांमध्ये आता कुशल मनुष्यबळ उपलब्ध असल्याने हा परिसर जागतिक कंपन्यांच्या पसंतीस उतरला आहे, आणि भारताच्या नव्या माहिती तंत्रज्ञान क्रांतीचा कणा म्हणून जबाबदारी उचलण्यासही सिद्ध झाला आहे. या उद्योगामुळे मोठ्या गुंतवणुकी तर होतीलच, परंतु बांधकाम काळात हजारो कामगारांना रोजगार मिळेल आणि प्रकल्प पूर्ण झाल्यावरही प्रत्येक संकुलात उच्च-कुशल नोकऱ्या निर्माण होतील. २०३०पर्यंत हजारो मेगावॅट क्षमता आणि लाखो कोटींची गुंतवणूक भारताला एक जागतिक 'डिजिटल पॉवर हाऊस' बनवेल. ही केवळ आर्थिक प्रगती नसून संपूर्ण राज्याच्या डिजिटल विकासाची एक नवी कहाणी आहे, आणि नव्या युगाची ही नवी कहाणी महाराष्ट्राच्याच नव्हे, तर संपूर्ण देशातील आगामी पिढ्यांसाठी रोजगाराच्या आणि प्रगतीच्या नवीन संधी निर्माण करणारी ठरणार आहे .**

# पुस्तकांची अमूल्य शक्ती ओळखा



युनेस्को १९९५पासून दरवर्षी २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन साजरा करत असून १००हून अधिक देशांमध्ये वाचन, प्रकाशन आणि कॉपीराइटला प्रोत्साहन देत आहे. हा विशेष दिवस आपल्याला पुस्तकांच्या अधिक जवळ जाण्यासाठी आणि आपल्या जीवनात त्यांचे महत्त्व अंगीकारण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रेरणा देतो. या वर्षी २०२६च्या जागतिक पुस्तक दिनाची संकल्पना "आवडीनुसार वाचन करा" ही असून वाचनाच्या छंदाला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

या शैलीतून हे दिसून येते की, तुम्हाला ज्या प्रकारच्या साहित्यात रस असेल, ते वाचा आणि वाचनाची सवय लावा. पुस्तके ही जीवनाचे प्रतिबिंब असतात, पुस्तके आपल्याला सत्य आणि नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. पुस्तके ही जीवनाचे प्रतिबिंब असतात, पुस्तके आपल्याला सत्य आणि नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. जगभरातील महान व्यक्ती त्यांच्या विशेष कामगिरीमुळे प्रसिद्ध झालेत. पैसा, प्रसिद्धी, नाव, काम आणि व्यस्तता असूनही आणि दर मिनिटाला लाखो रुपये कमावत असूनही उद्योगपती, खेळाडू, राजकारणी आणि चित्रपट नायकसुद्धा दररोज पुस्तकं वाचण्यासाठी आपल्या मौल्यवान वेळेतील काही क्षण काढतात.

आर्थिक अडचणी असताना एक वेळचे जेवण टाळून आणि त्यातून पैसे वाचवून पुस्तके विकत घेण्याचा प्रयत्न आपण कधी केला आहे का? जगात ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कठीण काळात पुस्तके विकत घेण्यासाठी एक वेळचे जेवणही सोडले होते, जेणेकरून आपण ज्ञानाचे मूर्तिमंत स्वरूप असलेल्या पुस्तकांचे तेज आत्मसात करू शकू. हीच पुस्तकांबद्दलची तळमळ, आवड आणि त्यांच्या महत्त्वाचे आकलन होय. बहुतेक मोठ्यालोकांकडे, त्यांच्या घरी पुस्तकांचा संग्रह असतो, पुस्तके वाचायला, जपायला आवडतात, म्हणजेच एक वैयक्तिक ग्रंथालय. जगात पुस्तकांपेक्षा उत्तम सोबती नाही. पुस्तके आपल्याला नेहमी योग्य दिशेने मार्गदर्शन करतात. पुस्तके आपला फावला वेळ देखिल ज्ञानाने भरून टाकतात. पुस्तके बुद्धीला तीक्ष्ण, जागरूक आणि विवेकी बनवून आपण सत्य आणि असत्य यांतील फरक ओळखायला शिकतो. पुस्तके आणि शिक्षणाच्या माध्यमातून आपण जगभरातील प्रत्येक क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त करू शकतो.

जागतिक पुस्तक दिन हा वाचन, पुस्तके, प्रकाशन, लेखकांचा गौरव आणि कॉपीराइट जागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो. आजही आधुनिक जीवनात पुस्तकांचे महत्त्व अतुलनीय आहे. पुस्तके शिकवतात, प्रेरणा देतात, मनोरंजन करतात आणि आपल्याला वेगवेगळ्या भाषा, संस्कृती व पिढ्या मध्ये जोडतात. जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनाची मुख्य उद्दिष्ट्ये सर्व वयोगटातील लोकांसाठी पुस्तके अधिक सुलभ करणे, वाचनाच्या सवयीला प्रोत्साहन देणे, प्रकाशन आणि साहित्यिक संस्कृतीला चालना देणे, बौद्धिक संपदेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि समाजातील प्रत्येक वाचकाला पुस्तके सहज उपलब्ध होतील याची खात्री करणे हे आहेत. पुस्तके कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता विकसित करतात, भाषा आणि संवाद कौशल्ये सुधारतात, संस्कृती आणि इतिहासाचे जतन करून विविध पिढ्यांमधील वाचकांना जोडतात, आणि शिक्षण घेण्यास व आजीवन शिकण्यास प्रोत्साहन देतात. नियमित वाचनामुळे शब्दसंग्रह, एकाग्रता, आत्मविश्वास आणि विचारशक्ती सुधारतात.

आजचा 'जागतिक पुस्तक दिन' हा पुस्तकांचा आनंद आणि सामर्थ्य साजरे करण्याची एक उत्तम संधी आहे. एखादे नवीन आवडते पुस्तक वाचून, ग्रंथालयांना भेट देऊन, मित्र, नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तींसोबत पुस्तकांची देवाणघेवाण करून किंवा इतरांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून हा दिवस साजरा केला पाहिजे. आपल्याला आवडत्या पुस्तकांवर इतरांशी किंवा मित्रांशी चर्चा करावी, आपल्याला ते पुस्तक का आवडते आणि इतर वाचकांनी ते का वाचले पाहिजे, हे स्पष्ट करावे, जेणेकरून इतर लोकांनाही प्रेरणा मिळेल आणि ते पुस्तक वाचण्याची उत्सुकता निर्माण होईल. चांगल्या पुस्तकांना नेहमी प्रोत्साहन दिले पाहिजे, जेणेकरून दर्जेदार पुस्तके वाचकांपर्यंत सहज पोहोचू शकतील. जो व्यक्ती पुस्तकांशी मैत्री करतो, त्याला यशाच्या मार्गावर जाण्यापासून कोणीही कधीही रोखू शकत नाही, कारण समस्येचे समाधान पुस्तकांमध्येच दडलेले असते. पुस्तके कधीही तक्रार करत नाहीत; ती केवळ ज्ञानाची नदी वाहत ठेवतात. ज्यांनी त्यांना स्वीकारले ते समृद्ध झाले, तर ज्यांनी त्यांचे महत्त्व दुर्लक्षित केले ते मागे पडले.

आजच्या इंटरनेटच्या युगात पुस्तकांचे स्वरूप डिजिटल झाले आहे, पुस्तके आपल्याला फक्त एका क्लिकवर सहज उपलब्ध होतात, म्हणजेच पुस्तके सहज उपलब्ध असूनही आज वाचनसंस्कृती कमकुवत होत असल्याचे दिसते. तरुण पिढी सोशल मीडियाच्या विळख्यात अडकत आहे, अभ्यासाच्या नावाखाली ते पुस्तकांऐवजी शॉर्टकट नोट्सवर अवलंबून राहणे पसंत करतात. परंतु या शॉर्टकट नोट्स विद्यार्थ्यांना केवळ काही प्रश्नांची मर्यादित उत्तरे देतात आणि त्यांना फक्त नाममात्र पदवी मिळविण्यात मदत करतात. पण जेव्हा एखाद्या विषयाच्या सखोल ज्ञानाचा किंवा जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्या ज्ञानाच्या महत्त्वाचा प्रश्न येतो, तेव्हा हेच विद्यार्थी अपयशी ठरतात, कारण या तरुणांनी गहन ज्ञान असलेल्या पुस्तकांचे महत्त्व कधीच समजून घेतलेले नाही किंवा वाचलेले नाही. अशा वातावरणात, जेव्हा जीवनातील परिस्थिती अस्थिर किंवा कठीण होते, तेव्हा माणूस समस्या सहजपणे सोडवण्याऐवजी डगमगतो आणि त्यापासून पळून जातो किंवा पळवाटा शोधतो. त्यामुळे नैराश्य, आत्महत्या, गुन्हेगारी आणि अमली पदार्थांचे व्यसन यांसारख्या समस्या झपाट्याने निर्माण होतात आणि जीवनात अडचणींचा डोंगर उभा राहतो. पुस्तके प्रत्येक अडचणीत आपल्या पाठीशी उभी राहतात, जे त्यांना ओळखतात ते पुन्हा कोणत्याही समस्येत अडकत नाहीत, कारण त्यांना परिस्थितीला कसे सामोरे जायचे हे माहीत असते आणि यश त्यांच्या जवळ येते.

सर्वप्रथम पुस्तके वाचण्याची सवय लावा, वेळेचा सदुपयोग करा, ज्ञानी बना व जागरूक व्हा आणि आयुष्यभर पुस्तकांशी मैत्री टिकवून ठेवा, म्हणजे पुस्तके नेहमी आपल्यासोबत राहतील. आनंदी, समाधानी आणि यशस्वी आयुष्य जगण्याची ही खूप सोपी पद्धत आहे.

**-डॉ. प्रीतम गेडाम**

# चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक सत्यजित रे

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे श्रेष्ठ भारतीय चित्रपट-दिग्दर्शक म्हणून सत्यजित रे यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज पुण्यतिथी. कोलकाता येथे एका कलावंत बंगाली कुटुंबात २३ मे १९१८ रोजी त्यांना जन्म झाला. कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून पदवी घेतल्यानंतर कलेच्या ओढीमुळे १९४० साली ते रवींद्रनाथ टागोरांच्या प्रेरणेने शांतिनिकेतनमध्ये दाखल झाले.

नंदलाल बोस यांच्यासारख्या चित्रकार-कलातज्ज्ञाचे तेथे मार्गदर्शन लाभल्यामुळे रे यांची अंगभूत कलासक्ती आणि सौंदर्यदृष्टी वृद्धिंगत होत गेली. तेथून बाहेर पडल्यावर १९४३च्या सुरुवातीला 'डी.जे. केमर अँड कंपनी' या ब्रिटिश जाहिरातसंस्थेत त्यांची वाणिज्य कलाकार म्हणून नेमणूक झाली. पुस्तकांची मुखपृष्ठे अत्यंत कलात्मक रीतीने सजविण्यात त्यांचा हातखंडा होता. नोकरीत असतानाच त्यांची चित्रपटाची रुची आणि व्यासंग वाढत गेला. रे त्यावेळी अनेक नियतकालिकांतून चित्रपटविषयक लेख लिहीत असत. १९४७मध्ये त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने 'कलकत्ता फिल्म सोसायटी' सुरू केली. १९५०मध्ये त्यांना कंपनीतर्फे उच्च शिक्षणाकरिता इंग्लंडला पाठविण्यात आले. बिभूतिभूषण बंदोपाध्याय या सुप्रसिद्ध लेखकाच्या पथेर पांचाली या कथेने त्यांच्या मनात घर केले होतेच. त्याच कथेवर चित्रपट काढावा असे त्यांना इतक्या तीव्रतेने वाटू लागले, की बोटीतून हिंदुस्थानात परत येत असतानाच त्यांनी त्यावर चित्रपटकथा लिहायला सुरुवात केली होती. या चित्रपटाला अनेक पारितोषिके मिळाली. पुढे त्यांनी अनेक चित्रपट काढले.

रे यांनी १९५९पासून आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवाचे ज्यूरी म्हणून अनेक देशांत काम केले आहे. त्यांना अनेक मान-सन्मान, पुरस्कार लाभले. २३ एप्रिल १९८२ रोजी त्यांचे निधन झाले.


(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल क्रोमवरची एक चूक अन् तुमची बँक खाती होतील रिकामी

तुम्ही रोज इंटरनेटवर काहीतरी सर्च करण्यासाठी गुगल क्रोम वापरत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. गुगल क्रोममधील काही गंभीर सुरक्षा त्रुटींमुळे तुमचा खासगी डेटा धोक्यात आला असून हॅकर्स तुमच्या सिस्टमवर ताबा मिळवू शकतात, असा गंभीर इशारा भारत सरकारने दिला आहे.




इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या 'इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (CERT-In) या संस्थेने ही चेतावनी जारी केली आहे. या एजन्सीने या समस्येला 'हाय सीव्हेरिटी' म्हणजेच अत्यंत गंभीर धोक्याच्या श्रेणीत ठेवले आहे.


CERT-Inच्या अहवालानुसार गुगल क्रोममध्ये अशा काही त्रुटी आढळल्या आहेत, ज्याचा फायदा घेऊन हॅकर्स तुमच्या संगणकात अनधिकृत प्रवेश मिळवू शकतात. हॅकर्स तुम्हाला एखाद्या संशयास्पद लिंकवर क्लिक करण्यास किंवा धोकादायक वेबसाइट उघडण्यास भाग पाडतात. तुम्ही एकदा का त्या लिंकवर क्लिक केले की, तुमच्या कॉम्प्युटरचा कंट्रोल हॅकर्सकडे जाऊ शकतो. यामुळे तुमचे सेव्ह केलेले पासवर्ड, बँकिंग डिटेल्स आणि इतर वैयक्तिक माहिती चोरीला जाण्याची दाट शक्यता आहे.

जर तुम्ही विंडोज, मॅक किंवा लिनक्सवर गुगल क्रोमचे जुने व्हर्जन वापरत असाल, तर तुम्ही हॅकर्सच्या निशाण्यावर आहात. विशेषतः जे लोक क्रोमचा वापर बँकिंग व्यवहार किंवा ऑफिसच्या कामासाठी करतात, त्यांच्यासाठी हा धोका अधिक मोठा आहे. वेब कंटेंट, मीडिया प्रोसेसिंग आणि बॅकग्राउंड सिस्टममध्ये या तांत्रिक त्रुटी असल्याचे समोर आले आहे.

घाबरून जाण्याचे कारण नाही, कारण गुगलने यावर उपाय म्हणून नवीन अपडेट जारी केले आहे. तुमचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तुम्हाला तुमचे गुगल क्रोम ब्राउझर त्वरीत अपडेट करणे आवश्यक आहे.

क्रोम अपडेट करण्याची सोपी पद्धत : कॉम्प्युटरवर Google Chrome उघडा. उजव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात असलेल्या तीन डॉट्सवर क्लिक करा. त्यानंतर 'Settings'मध्ये जा आणि डाव्या बाजूला असलेल्या 'About Chrome' पर्यायावर क्लिक करा. येथे क्रोम आपोआप नवीन अपडेट चेक करेल आणि ते इन्स्टॉल होईल. अपडेट पूर्ण झाल्यावर 'Relaunch' बटणावर क्लिक करा.

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे



**निमित्त**

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील जमखंडी येथे त्यांचा जन्म झाला. त्यांनी प्रारंभी जमखंडी येथे शिक्षकाची नोकरी केली. पुढे वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्यासाठी त्यांना प्रार्थना समाजाने मदत केली. भारतात परतल्यानंतर त्यांनी मिळणारे सारे मान सन्मान, उच्च अधिकाराच्या जागा नाकारल्या आणि स्वतःला प्रार्थना समाजाच्या कार्याला वाहून घेतले. आपल्या समाजाला अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, कर्मकांड, रुढी आणि परंपरांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी अवघे जीवन समर्पित केले.

विठ्ठल शिंदे यांनी स्वातंत्र्यलढात सहभाग घेतला. अस्पृश्यता निवारणाचे काम हाती घेतले. अस्पृश्य समजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, अस्पृश्यांना नोकरीची संधी मिळवून देणे, त्यांच्या अडचणी सोडवणे, त्यांना खऱ्या धर्माची शिक्षण देणे, त्यांच्या प्रगती आणि ज्ञानाची तहान निर्माण करणे यासाठी त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. अस्पृश्य समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण, अस्पृश्य बांधवांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडचणींचे निवारण करणे, अस्पृश्यांना खऱ्या धर्माची शिकवण देणे आणि त्यांचे शीलसंवर्धन घडून आणणे ही या मिशनची वैशिष्ट्ये होती.

'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' संस्थेच्या माध्यमातून अनेक उपक्रम हाती घेतले. त्यांमध्ये अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू करणे, त्यांच्यासाठी वसतिगृहे उघडणे, शिवणकामाचे वर्ग चालवणे, प्रबोधनपर व्याख्याने कीर्तने आयोजित करणे, आजारी असणाऱ्या लोकांची सेवा करणे, इत्यादी गोष्टींचा समावेश या संस्थेच्या कार्यामध्ये होता. संस्थेच्या अकोला, अमरावती, इंदूर, कोल्हापूर, ठाणे, दापोली, पुणे, भावनगर, मद्रास, मालवण, मुंबई, सातारा, हुबळी, इत्यादी ठिकाणी उघडण्यात आल्या होत्या. सोबतच १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ लिहिला. त्याद्वारे या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे काम केले.

कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता काम करणारे थोर समाजसेवक म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे. त्यांनी इंग्लंडला जावून त्या काळी उच्चशिक्षण घेतले. त्यानंतर भारतात परतल्यानंतर मोठमोठाले मान-सन्मान आणि नोकऱ्या नाकारून अस्पृश्यता निवारण आणि स्वातंत्र्यलढ्यात वाहून घेतले.

शेतकरी चळवळीलाही बळ दिले. त्यांनी शेतकऱ्यांसाठी काम केले. त्यांना जागृत आणि संघटित करण्यासाठी त्या काळात शेतकरी परिषदांचे आयोजन केले. १९२० ते १९२६ या काळात त्यांनी शेतकरी चळवळ उभी केली, पण सरकारने तुकडे बंदीचे बिल मागे घेताच चळवळीत वाद सुरू झाले आणि चळवळ थांबली.

ब्राह्मो उपासना केंद्रे चालवणाऱ्या रवींद्रनाथांना भेटले. त्यानंतर शिंदे पूर्व बंगालमध्ये गेले. तेथे त्यांनी वेगवेगळ्या शहरांत व गावांत ब्राह्मो धर्मावर भाषणे दिली. आपल्या समाजातील पददलित, उपेक्षित वर्गाच्या उन्नतीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत ते झटले, मात्र आयुष्यभर त्यांच्या कामाची उपेक्षाच झाली. या थोर समाजसेवकाने २ जानेवारी १९४४ रोजी या जगाचा निरोप घेतला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# केस काळे करण्याच्या डायने लिव्हर डॅमेजचा धोका?

कमी वयात केस पांढरे होण्याची समस्या हल्ली भरपूर वाढली आहे. चुकीचं खाणं-पिणं, चुकीची लाइफस्टाईल अशी याची वेगवेगळी कारणे सांगितली जातात. मग काय पांढरे केस काळे करण्यासाठी जास्तीत जास्त लोक हेअर डायचा मार्ग निवडतात, पण सॅलूनमध्ये केसांचा रंग बदलताना अनेकांच्या मनात प्रश्न येतो की हे केमिकल्स शरीरासाठी, खासकरून लिव्हरसाठी, नुकसानदायक आहेत का? मात्र याबाबतचं सत्य जरा वेगळं आहे.



सैफी हॉस्पिटलचे हेपॅटोलॉजिस्ट डॉ. चेतन कलाल यांनी सांगितलं की, नियमितपणे कॉस्मेटिक हेअर डाय वापरल्याने सामान्य लोकांमध्ये लिव्हरला गंभीर नुकसान होतं, असा ठोस वैज्ञानिक पुरावा नाही, कारण बाजारात मिळणारे बहुतेक डाय नियंत्रित असतात आणि टाळूमधून त्यांचे शोषण खूप कमी प्रमाणात होते.

याचा अर्थ असा नाही की धोका अजिबात नाही. काही दुर्मिळ केसेसमध्ये पॅरा-फिनाइलिन डायमीनसारख्या केमिकल्समुळे लिव्हर डॅमेजची उदाहरणे आढळली आहेत, मात्र ही प्रकरणे खूपच कमी आणि व्यक्तीनुसार वेगवेगळी असतात.

कोणत्या परिस्थितीत धोका वाढतो?

डॉ. हर्षिल शाह यांच्या मते, टाळूवर जखम किंवा सूज असताना डाय वापरणे, डायचा वायू जास्त प्रमाणात श्वासातून जाणे, वारंवार आणि दीर्घकाळ वापर, आधीपासून काही आरोग्य समस्या असणे या स्थितींमध्ये धोका असतो. सामान्यतः यामुळे स्किन ॲलर्जी जास्त दिसते, जी त्रासदायक असते पण बहुतेक वेळा गंभीर नसते.

स्मोकिंगचा मोठा प्रभाव

लिव्हरच्या दृष्टीने स्मोकिंग हा मोठा धोका आहे. त्यामुळे ऑक्सिडेटिव स्ट्रेस, सूज आणि लिव्हर डॅमेज वाढू शकते. त्यामुळे फक्त हेअर डायपेक्षा स्मोकिंग सोडणे अधिक महत्त्वाचे आहे.

सुरक्षित वापर कसा करावा?

- नेहमी विश्वासार्ह आणि प्रमाणित ब्रँड वापरा
- प्रत्येक वेळी पॅच टेस्ट करा
- जखमी किंवा इन्फ्लेम्ड टाळूवर डाई लावू नका
- "हर्बल" किंवा "अमोनिया-फ्री" म्हणजे पूर्णपणे सुरक्षित असेलच असे नाही.

# श्रीवर्धनमध्ये पर्यावरणपूरक पर्यटनाच्या दिशेने वाटचाल

## वन पर्यटन प्रकल्पातून नवी चालना



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील निसर्गसंपन्न समुद्रकिनाऱ्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या श्रीवर्धन शहरात आता पर्यावरणपूरक पर्यटनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात आहे. समुद्रकिनाऱ्यालगत वन विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या “वन पर्यटन प्रकल्पा”मुळे स्थानिक पर्यावरण संवर्धन, पर्यटनवाढ आणि रोजगारनिर्मिती या तिन्ही बाबींना एकाच वेळी चालना मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

अलीकडेच ब्लू फ्लॅग बीच मानांकन मिळविण्याच्या दिशेने श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याची निवड प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आली आहे. हे मानांकन कायमस्वरूपी प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सुरक्षितता व पर्यटन व्यवस्थापनाच्या निकषांची पूर्तता करण्याच्या पार्श्वभूमीवर “श्रीवर्धन निसर्ग पर्यटन” ही संकल्पना पुढे आली आहे.

समुद्रकिनाऱ्यालगत वन विभागाच्या सर्वे क्रमांक ३६० मधील जागेवर स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि पर्यावरण जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये प्रवेशद्वारासाठी आकर्षक कमान, पर्यटकांसाठी सेल्फी पॉइंट, माहितीपर फलक तसेच जैवविविधतेची माहिती देणारी संरचना उभारण्याचे नियोजन आहे. या सुविधांमुळे पर्यटकांना केवळ मनोरंजन नव्हे तर निसर्गाविषयी ज्ञान मिळविण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.

विशेष म्हणजे, किनाऱ्यावर असलेले सुरू (Casuarina) रोपवन हे समुद्री वादळे व जोरदार वाऱ्यांपासून संरक्षण करणारे नैसर्गिक कवच मानले जाते. वन पर्यटन प्रकल्पामुळे या रोपवनाचे दीर्घकालीन संवर्धन व संरक्षण शक्य होणार असून, किनारपट्टीच्या स्थैर्यालाही बळकटी मिळणार आहे.

या प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी. मार्गदर्शक, पर्यटक व्यवस्थापन, सुरक्षा, स्वच्छता आणि पर्यावरण शिक्षणाशी संबंधित विविध क्षेत्रांत स्थानिकांना कामाच्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. भविष्यात या प्रकल्पाच्या माध्यमातून ऑलिव्ह रिडले कासव संवर्धन, किनारी जैवविविधता अभ्यास, तसेच पक्षी निरीक्षण (गिधाड, धनेश, समुद्री घार) यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचा मानस आहे. यामुळे श्रीवर्धन हे केवळ पर्यटन स्थळ न राहता “इको-टुरिझम”चे केंद्र म्हणून विकसित होण्याची शक्यता आहे. संपूर्ण प्रकल्पात पर्यावरणीय समतोल राखण्यावर भर देण्यात आला असून, शाश्वत विकासाच्या तत्वांनुसार नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे पर्यटनवाढ आणि निसर्गसंवर्धन यामध्ये समतोल राखत श्रीवर्धन शहराला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर विशेष स्थान मिळवून देण्याची क्षमता या वन पर्यटन प्रकल्पात असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# रोहा-कोलाड मार्गावर अपघात; एक जण ठार

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-कोलाड मार्गावरील बारसोली गावच्या बसस्टॉपजवळ सोमवारी (दि.२१) मध्यरात्रीच्या सुमारास भीषण अपघात घडून एका पादचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्या अज्ञात चालकाने दिलेल्या जोरदार धडकेत हा प्रकार घडला असून अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाला.

मृत व्यक्तीची ओळख किल्ला येथील रहिवासी ज्ञानेश्वर कृष्णा जाधव (वय ४०) अशी झालेली आहे . बारसोली बसस्टॉप परिसरात पायी जात असताना अचानक अज्ञात वाहनाने त्यांना जबर धडक दिली. या धडकेत त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तत्काळ रोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या अपघातानंतर संबंधित चालकाने कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पलायन केल्याने संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एम. आय. पाटील यांच्या सूचनेनुसार पोलीस कर्मचारी महेंद्र दामा शिद (बकल क्रमांक ७७३) करीत आहेत.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवावा -जिल्हाधिकारी जावळे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी जावळे बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के,



भारतीय तटरक्षक दलाचे अभिषेक कुमार, आपत्ती व्यवस्थापन अधिकार सागर पाठक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, पावसाळा सुरु होण्याकरिता एक महिन्याचा कालावधी बाकी असून सर्व शासकीय यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. आपत्ती काळात आपदामित्रांचे सहकार्य खूप महत्वाचे असून ते तत्काळ मदतीला धावून येवून महत्वाची भूमिका बजावत असतात. याकरिता आपदा मित्र हे रायगड जिल्ह्याला लाभलेले एक वरदानच आहे. प्रत्येक विभागांनी आपला नियंत्रण कक्ष २४x७ कार्यान्वित ठेवावा. याकरिता एक समन्वयक अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. जलसंपदा विभागाने आपल्या अखत्यारित असलेली धरणे, मध्यम प्रकल्पांची तपासणी करावी. आरोग्य विभागाने प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेशा औषधसाठा, व्हॅक्सीन उपलब्ध ठेवाव्यात. आपत्तीकाळात रोगराई पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. विविध विभागांचे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापन आराखडे जिल्हा प्रशासनास पाठविण्यात यावेत.

तसेच रायगड पाटबंधारे विभागाने धरणांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अतिवृष्टी विचारात घेवून टप्प्या-टप्याने धरणांतून विसर्ग करावा अशा सूचनाही जावळे यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, तसेच या काळात पूर्व परवानगी शिवाय कुणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश ही त्यांनी यावेळी दिले.

# रवींद्र कर्वे यांना पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

नव्वदाव्या वर्षात पदार्पण केलेल्या दि एज्युकेशन सोसायटीतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा ‘दधिची’ पुरस्कार यंदा सेवा सहयोग फाउंडेशनच्या विद्यार्थी विकास योजनेचे प्रणेते रवींद्र कर्वे यांना जाहीर झाला आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी उद्योजक शिरीष बेंडाळे यांना ‘अंबरनाथ भूषण’ आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल डॉ. अरविंद कुलकर्णी यांना ‘आचार्योत्तम’ पुरस्कार जाहीर करण्यात आला.



या पुरस्कारांचे वितरण शनिवार दि.२५ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता अंबरनाथ (प) येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या सभागृहात आयोजित समारंभात होणार आहे. ज्येष्ठ लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे.

‘दधिची’ पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे आहे. रविंद्र कर्वे यांनी टीजेएसबी बँकेच्या सीईओ पदावरून निवृत्त झाल्यानंतर गेल्या १५ वर्षांपासून विद्यार्थी विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या पुढाकारातून सुरू झालेली योजना आज महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांतील २०७ तालुक्यांमध्ये विस्तारली असून, हजारो आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मदत मिळत आहे.

# पळसदरी धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**खालापूर, कर्जत : प्रतिनिधी**

पोहण्यासाठी उतरलेल्या तरुणाचा पळसदरी धरणात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नवी मुंबई घणसोली येथील आर्यन थापर (वय २०), पळसदरी डॅमीमध्ये पोहण्यासाठी उतरला होता. पोहायला येत असतानाही आर्यन बुडाल्याने त्याच्या मित्रांमध्ये शोकाचे वातावरण आहे.



आर्यन नवी मुंबई भारती विद्यापीठात बी. सी. एम. च्या प्रथम वर्गात शिकत होता. कॉलेजच्या प्रोजेक्टसाठी तो कर्जत येथे आला होता. त्याच्याबरोबर कार्यक्रमासाठी कॉलेजचे जवळपास ७० विद्यार्थी होते. कार्यक्रम संपल्यानंतर त्याचे काही मित्र व तो धरणात पोहण्यासाठी उतरला. दोन वेळा त्याने धरणाला चक्कर ही मारली, मात्र तिसऱ्यांदा पुन्हा पाण्यात उतरल्यावर तो अचानक खोल पाण्यात गायब झाला. ही घटना लक्षात येताच त्याच्या मित्रांनी मोठ्याने आरडा ओरड करत मदतीसाठी धावपळ सुरू केली, मात्र त्याला वाचवणे शक्य झाले नाही. आर्यन पोहत असतानाचा एक व्हिडिओदेखील समोर आला असून तो खोल पाण्याकडे जात असल्याचे दिसत आहे.

या घटनेची माहिती मिळतात कर्जत पोलिसांचे पोलीस कर्मचारी तसेच खोपोली येथील हेल्प फाउंडेशनच्या रेस्क्यू टीमने घटना स्थळी धाव घेतली, मात्र अंधार झाल्याने दुसऱ्या दिवशी त्याचा शव पाण्यातून बाहेर काढला. ही घटना मंगळवारी सायंकाळी ५ वा सुमारास घडली.


**PUBLIC NOTICE**

**Re: In The High Court of Judicature at Bombay**
**Ordinary Original Civil Jurisdiction**
**In its Commercial Division**
**Commercial Civil Suit No. 93 of 2025**

**Anuj Mahendra Banthia ... Plaintiff**
**Versus**
**PVP Star Hotels Pvt. Ltd. & Ors. ...Defendants**

**NOTICE** is hereby given to the public at large that my client **Mr. Anuj Mahendra Banthia,** has filed above Commercial Suit before The Honourable Bombay High Court, against **PVP Star Hotels Pvt. Ltd. and its directors Mr. Nitinkumar Babubhai Gajipara, & Jignesh Rajubhai Vaghani** for sale and transfer of 100% equity shares of PVP Star Hotels Pvt. Ltd. (Suit Shares) alongwith suit plots i.e. Plot No. 15 & 16, admeasuring about 10377.50 Sq. Mtrs., situated at Sector 15, C.B.D. Belapur, Navi Mumbai in favour of the Plaintiff and for other reliefs.

In the said Commercial Suit No.93 of 2025 the Honourable High Court Bombay vide its order dated 13.1.2026, has directed parties to proceed for Mediation under Section 12A of Commercial Courts Act. In pursuance of order dated 13.1.2026, Plaintiff has filed mediation proceedings before Hon. Maharashtra State Legal Services Authority, Mumbai being Mediation Application No.30 of 2026. In the said mediation proceedings PVP Star Pvt. Ltd. as well its new directors have given their consent to proceed with mediation proceedings.

Hence any person/s, financial institution, banks dealing with **PVP Star Hotels Pvt. Ltd. and its directors** with regard to sale, purchase or in any other manner in relation to suit shares or suit plots, shall do at their own risk as to cost and consequences

Dated this 22nd day of April, 2026.

**sd/-**
**Idris M Vohra**
**Advocate for Plaintiff**
**1256, M.G.Road, Tapal Naka,**
**Panvel, Raigad 410206**


# सुपेगाव-फणसाड मार्गाचे रुंदीकरण, दुरूस्तीची प्रवाशांकडून मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

सुपेगाव फणसाड अभयारण्यातील मार्ग सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून हा रस्ता खडेमय व अतिशय अरुंद आहे. विशेषतः ऊसरोल ते फणसाड अभयारण्य प्रवेशद्वारापर्यंतचा अंदाजे ४ ते ५ किमीचा भाग अत्यंत धोकादायक स्थितीत असून अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत.



सध्या मुरूड काशीद मार्गे रेवदंडा अलिबाग या मुख्य रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे या मार्गाने प्रवास करण्यास मोठा वेळ लागत आहे. परिणामी, मुरूड परिसरातील सुमारे ९०% ते ९५% नागरिक, पर्यटक, रुग्णवाहिका तसेच मालवाहतूक करणारी वाहने वेळ वाचवण्यासाठी सुपेगाव फणसाड मार्गाचा वापर करत आहेत.

वन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कोणतीही प्रशासकीय किंवा तांत्रिक अडचण न आणता तातडीने ही कामे हाती घेऊन लवकरात लवकर हा रस्ता अद्यवत करण्यात यावा, अशी मागणी असंख्य ग्रामस्थ व प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी तरी सार्वजनिक बांधकाम खात्याने येथील खड्डे बुजवून रुंदीकरण करून हा रस्त्यावर कार्पेट अंथरावे, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे करण्यात येत आहे.

या बाबत आमच्या प्रतिनिधीने मुरूड सार्वजनिक बांधकाम खात्याचे उप अभियंता अजित सांगळे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ऊसरोल सुपेगाव रस्त्याचे खड्डे बुजवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी खड्डे भरण्याचे टेंडर सुद्धा मंजूर झाले आहे. वन खात्याची परवानगी मागितली असून लवकरच या कामास सुरुवात होणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.


**महावितरण**

**जाहीर निवेदन**
**जागा भाडयाने मिळणेबाबत**

म.रा.वि.वि.कंपनीच्या नेरळ उपविभागीय कार्यालयासाठी नेरळ शहर, तालुका-कर्जत जिल्हा- रायगड येथे सुमारे १२०० चौ. फुट इतकी जागा भाडयाने घ्यावयाची आहे. तरी इच्छुक जागा मालकांनी त्यांची जागा कोणत्या दराने देण्यास ते तयार आहेत. याबाबतचे सीलबंद देयक कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, पनवेल ग्रामीण विभागीय कार्यालय, पनवेल यांचेकडे दिनांक ३०/०४/२०२६ पर्यत सादर करावेत.

PRO NO - ०४७ **कार्यकारी अभियंता, महावितरण, पनवेल ग्रामीण विभाग**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०६/०४/२०२६ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई,दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्राच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल आणि दुरुस्ती..... शुद्ध पाण्याच्या व सांडपाणी निःसरण वाहिनीवर बसवलेल्या फुलबोर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटर्ससाठी दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीकरिता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १८,९४,०६८.०० |
| २. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती...... सावणे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मे.एचपीसीएल भूखंड, सामाईक सुविधा केंद्राच्या इमारतीच्या मागचा रस्ता, जुने व नवीन जलशुद्धिकरण केंद्र, एचएसआर, जॅकवेल या भागातील खड्डे भरणे. | ₹ २३,२६,६८२.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**महाराष्ट्र शासन**

**शासकीय अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, पनवेल, जि. रायगड.**
Government of Maharashtra
**Govt. Minority Girls' Hostel, Panvel, Dist. Raigad**
शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१०२०६

**जाहिरात**

शासकीय अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, पनवेल यांचे भोजनालयातील फुटलेली भांडी व तुटलेले दरवाजे यांचा लिलाव दि.१५/५/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. इच्छुकांनी कार्यालयात उपस्थित रहावे.

**सही/-**
**अध्यक्ष**
**अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह**
**प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय**
**पनवेल (महाराष्ट्र शासन)**



**महावितरण**

**जाहीर सूचना**

पेण मंडळ अंतर्गत सर्व ठेकेदार व खाली दिलेल्या विविध कारणास्तव जे म.रा.वि.वि.कं. मर्या. पेण मंडळातील ठेकेदार आहेत, अशा सर्वांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे तीन वर्षाच्या आधीची १. कंत्राटदार अनामत रक्कम (Security Deposit) २. बयाना रक्कम (EMD) ३. कंत्राटदार धारणा रक्कम (Contractor Retention Money) यादी ही कार्यालयीन समायोजित करावयाची आहे. पेण मंडळातील अंतर्गत काम केलेले ठेकेदार व विविध कारणास्तव असलेले ठेकेदार यांनी त्याची दखल घ्यावी तसेच सदर यादी ही, अधीक्षक अभियंता पेण मंडळ / कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय अलिबाग / गोरेगाव / पनवेल (ग्रा) / रोहा या कार्यालयात उपलब्ध आहे. कोणाची काही हरकत असल्यास जाहिरात प्रसिद्ध झालेल्या तारखे पासून १० दिवसाच्या आत अधीक्षक अभियंता पेण मंडळ/ कार्यकारी अभियंता अलिबाग विभाग/ कार्यकारी अभियंता, गोरेगाव विभाग / कार्यकारी अभियंता, पनवेल (ग्रा) विभाग / कार्यकारी अभियंता, रोहा विभाग यांचे कार्यालय येथे पुराव्यानिशी संपर्क साधावा विहित मुदती नंतर सदरची रक्कम समायोजित होईल. नंतरची कोणतीही सबब एकली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**अधीक्षक अभियंता, पेण मंडळ पेण**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर सूचना देण्यात येते की, विनोद भान पांडे यांच्या मालकीचे प्रत्यक्ष ताबेकब्जातील मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद शेतजमिन मिळकत आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेणार आहेत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे - गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड**

| गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| जुना गट क १८<br>जुना गट क १२०<br>नवीन गट क ८४ | २<br>२<br>२/सी | क्षेत्रफळ ०-९०-०० | ०.६१ |

तरी सदरहू मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपाआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखीपुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २१/०४/२०२६**

**सही/-**
**आनंद वाय. धोंगडे**
ॲडव्होकेट
१०३, ए विंग, निल रिद्धी एमरलॅण्ड, प्लॉट नं. ५२७, तहसील ऑफिस जवळ, पनवेल
मोबाईल नं. ७५०६४९८५०३

# नवी मुंबई एपीएमसीत धडक कारवाई

## विशेष तपासणी मोहिमेत शेकडो वाहनांवर जप्ती आणि दंड आकारणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) फळ व भाजी बाजारात सेस बुडवण्याच्या प्रकारांवर आळा घालण्यासाठी प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. यामुळे शेतमालाच्या व्यवहाराची रक्कम कमी दाखवणाऱ्यांना चाप बसणार असून या कारवाईमुळे महसूल वाढ होणार आहे. व्यापारी, वाहतूकदार आणि ग्राहक यांच्या संगनमताने चालणाऱ्या गैरप्रकारांवर या मोहिमेमुळे लगाम बसणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.



सध्या आंब्यासह विविध फळांचा हंगाम सुरू असून बाजारात १०० रुपयांपासून ते २ हजार रुपयांपर्यंत व्यवहार होत आहेत, मात्र या उलाढालीच्या तुलनेत अपेक्षित सेस वसुली होत नसल्याचे निर्दशनास आले. तपासणीदरम्यान व्यापाऱ्यांकडून कमी दर दाखवून गेट पास तयार करणे, प्रत्यक्ष मालाच्या तुलनेत कमी वजन दाखवणे अशा प्रकारांतून महसूल बुडवला जात असल्याचे उघड झाले. बाजारात १०० किलो माल असताना केवळ ५० किलोवरच सेस भरल्याची प्रकरणे समोर आली आहेत. आंबा, कलिंगड, संत्री, मोसंबी, अननस, सफरचंद यांसारख्या फळांबाबत हे प्रकार मोठ्या प्रमाणात आढळले असून, भाजी बाजारातही काही प्रमाणात अशीच अनियमितता आढळली आहे.

पणन संचालक तथा सचिव शरद जरे यांच्या आदेशानुसार दक्षता पथक आणि उपसचिव कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबवली जात आहे. 'मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती'च्या उत्पन्नात वाढ आणि कारभार अधिक शिस्तबद्ध करण्याच्या उद्देशाने फळ व भाजी बाजारात विशेष तपासणी सुरू करण्यात आली आहे.

१५ एप्रिलपासून सुरू झालेल्या या मोहिमेत सेस कमी भरल्याचे आढळलेल्या वाहनांवर जप्तीची कारवाई करून पंचनामे करण्यात आले आहेत. तसेच संबंधितांवर दंडात्मक कारवाईही करण्यात येत आहे. फळ बाजारातील जावक गेटवर तपासणी अधिक कडक केल्याचा परिणाम आता महसुलात दिसून येत आहे.

पूर्वी दररोज ३ ते ४ लाख रुपयांची सेस वसुली होत असताना, ती आता ६ ते ८ लाख रुपयांपर्यंत वाढल्याचे सचिव शरद जरे यांनी स्पष्ट केले. कारवाईचा धसका घेत अनेक व्यापारी आणि ग्राहक नियमानुसार सेस भरण्याकडे वळले असून, पुढील काळातही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# नेरूळमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळला; नागरिक सुखरूप

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर १६ ए परिसरात एका इमारतीच्या मजल्याचा संपूर्ण स्लॅब मंगळवारी सायंकाळी कोसळल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली. तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आहे. तर इमारतीतील नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्याची प्रक्रिया पालिकेच्यावतीने करण्यात आली असून, ही इमारत सुरक्षेसाठी सील करण्यात येणार असून, नागरिकांना मार्केट वास्तूमध्ये हलविण्यात आले.

नेरूळ सेक्टर १६ ए मधील वूडलँड सोसायटीच्या पाचव्या मजल्याचा स्लॅब चौथ्या मजल्यावर कोसळला. ज्यांच्या घरात हा स्लॅब कोसळला त्या घरातील व्यक्ती किचनमध्ये असल्याने सुदैवाने कोणतीही



दुखापत झाली नाही. तर चौथ्या मजल्यावर स्लॅब कोसळून तिसऱ्या मजल्यावर तसाच राहिला अन्यथा संपूर्ण मक्याचे स्लॅब कोसळून जीवितहानी होण्याची शक्यता होती.

तातडीने अग्निशमन दलाने धाव घेतली. या नागरिकांना सुखरूप अग्निशमन दलाने त्यांच्या घरातील साहत्यासह बाहेर काढले. त्या नागरिकांची व्यवस्था कुकशेत येथील मार्केटच्या नवीन वास्तूमध्ये करण्यात आली. तर काही नागरिकांनी त्यांच्या नातेवाईकांकडे जाणे पसंत केले.

> **सायंकाळच्या सुमारास स्लॅब कोसळल्याची घटना घडली. पाचव्या मजल्याचे फ्लोअरिंग म्हणजेच चौथ्या मजल्यावर संपूर्ण छत खाली कोसळले. त्यामुळे संपूर्ण मजल्याला भगदाड पडले. तातडीने नागरिकांनी. हलविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अग्निशमन दल कार्यरत झाले आहे. ही इमारत सील करण्यात येणार आहे.**
> **–सूरज पाटील,**
> नगरसेवक, नेरूळ

# उष्णतेच्या तडाख्यासह नागरिकांना अतिवीज वापरामुळे वीजबिलांत फटका

**उरण : बातमीदार**

एप्रिलच्या सुरुवातीपासूनच जसा उन्हाळा सुरू होतो तसे तसे उष्णतेचा तीव्र तडाखा नागरिकांना जाणवत असून, नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. दिवसाची काहिली संपत नाही तोच रात्रीही उकाड्यामुळे झोप उडत असल्याने एसी, कुलर आणि पंख्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, मात्र या वाढत्या वापराचा थेट परिणाम वीजबिलांवर होत असून, सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

उरण परिसरात दुपारच्या वेळी रस्ते ओस पडलेले दिसत असून 'अघोषित संचारबंदी'सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. मात्र घरात राहूनही उष्णतेपासून सुटका होत नसल्याने एसी, कुलर व पंख्यांचा वापर अपरिहार्य ठरत आहे.

कुलरच्या किमतीत सुमारे ३० टक्यांनी




वाढ झाली असून छोटे कुलर १५०० ते १९०० रुपये, तर मोठे कुलर ४५०० ते ५००० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. पंख्यांच्या दरातही १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ग्रीन नेटसारख्या उष्णतारोधक साधनांची मागणी वाढल्याने त्यांचे दरही चढले आहेत. उष्णतेमुळे नागरिक लिंबूपाणी, ताक, फळांचे रस, नारळपाणी यांसारख्या थंड पेयांकडे वळत असले तरी त्यासाठीचा खर्चही वाढत चालला आहे. त्यामुळे उष्णतेपासून वाचायचे की वीजबिल भरायचे ? असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे.

वाढत्या वीज बिलामुळे नागरिकांच्या अडचणीत भर पडला आहे. मार्च महिन्यापासूनच विजेचा वापर झपाट्याने वाढल्याने वीजबिले 'अव्वाच्या सव्वा' येऊ लागली आहेत. अनेक कुटुंबांना आलेल्या बिलांचा आकडा पाहून धक्का बसत असून, घरगुती अर्थसंकल्प कोलमडला आहे. एकीकडे उष्णतेपासून बचावासाठी लागणाऱ्या साधनांच्या किमती वाढल्या आहेत, तर दुसरीकडे वाढलेली वीजबिले नागरिकांच्या अडचणीत भर घालत आहेत. पुढील काही दिवस तापमान आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून, त्यानुसार वीजबिलांचा भारही वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.अगोदरच उन्हाळा, तापते वातावरण त्यातही वाढते महागाई, वाढते वीज बिल यामुळे उरणची जनता दुहेरी संकटात सापडली आहे.

# घरोघरी मसाले बनविण्याच्या कामांना वेग

**नवी मुंबई : बातमीदार**

उन्हाची तीव्रता वाढू लागली की घराघरांत पारंपरिक कामांना सुरुवात होते. विशेषतः महिलांकडून विविध प्रकारचे मसाले तयार करण्याची लगबग सुरू होते. दररोजच्या स्वयंपाकात वापरला जाणारा लाल मसाला हा प्रत्येक घराचा अविभाज्य भाग असल्याने त्याची गावच्या मोकळ्या जागेत मोठ्या उत्साहात तयारी केली जाते.

यावेळी, सुका मसाला, लाल मसाला, घाटी मसाला, गोडा मसाला तसेच आगरी-कोळी मसाला असे विविध प्रकार घराघरांत बनवले जातात. प्रत्येक कुटुंबाची मसाला तयार करण्याची पद्धत वेगळी असली तरी त्यामागील चव आणि परंपरा एकसारखीच जपली जाते. ऐन हंगामात मिरचीचे दर वाढतात,



त्यामुळे महिला आधीच मिरची खरेदी करून ती तीन ते चार वेळा उन्हात वाळवून ठेवतात. त्यानंतर त्यात गरम मसाला, धणे, बडीशोप यांसारख्या घटकांचे मिश्रण करून मसाला तयार केला जातो.

सध्या बाजारपेठेत मसाल्यांच्या खरेदीला चांगलाच वेग आला असून मिरची, मिरची पूड आणि खडा मसाला यांना मोठी मागणी आहे. दरवर्षीप्रमाणे मार्च ते एप्रिल महिन्यात तिखट बनवण्याची तयारी सुरू होते आणि आता ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

विशेष म्हणजे नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाडा, नेरुळ, घणसोली, दिघा, कोपरखैरणे, वाशी आणि करावे, बेलापूर परिसरातील मूळ गावांमध्ये मसाला बनवण्याचा हंगाम रंगात आला आहे. या ठिकाणी अजूनही पारंपरिक पद्धती जपल्या जात असून अंगणात किंवा मोकळ्या जागेत मिरच्या वाळवताना दिसतात. काही ठिकाणी महिलांचा एकत्रित गट तयार होऊन मोठ्या प्रमाणावर मसाले बनवले जातात.

दरम्यान, या प्रक्रियेत महिलांची मेहनत खूप मोठी असते. मिरची निवडणे, वाळवणे, भाजणे, दळणे आणि योग्य प्रमाणात मिश्रण करणे या सर्व टप्प्यांमध्ये बारकाईने लक्ष द्यावे लागते. त्यामुळे हा केवळ घरगुती उपक्रम न राहता अनेक महिलांसाठी रोजगाराचे साधनही बनला आहे.

पावसाळ्यापूर्वी तयार केलेल्या घरगुती मसाल्यामुळे स्वयंपाकाला खास चव येते, याची जाणीव सर्वांना असल्याने शहरात राहणारे अनेकजणही आपल्या गावाकडील नातेवाईकांकडून मसाले तयार करून घेत आहेत. यामुळे महिनाभर आधीपासूनच गृहिणींची मिरची आणि मसाल्याच्या साहित्याच्या खरेदीसाठी धावपळ सुरू झाली असून पारंपरिक पद्धतीने मसाले तयार करण्याची परंपरा आजही तितक्याच उत्साहाने जपली जात असल्याचे देवयानी पाटील यांनी सांगितले.

# महिलांचा कायदा व प्रशासनावर विश्वास वाढविणे महत्त्वाचे –रहाटकर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महिलांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी 'राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत महिलांचा कायदा व प्रशासनावर विश्वास वाढविणे, ही महत्वाची बाब असून अशा उपक्रमांमुळे महिलांना न्याय मिळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.

विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली महिला जनसुनावणी आयोजित करण्यात आली. या जनसुनावणीत विविध प्रकारच्या एकूण २८ प्रकरणांवर सुनावणी पूर्ण झाली. तर उर्वरित प्रकरणांवर येत्या आठ दिवसात निराकरण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधिताना दिल्या.

"राष्ट्रीय महिला आयोग आपल्या दारी" या उपक्रमांतर्गत महिला जनसुनावणी नवी मुंबई बेलापूर येथील



सिडको भवन येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी राष्ट्रीय महिला आयोग अतिरिक्त सचिव राधिका चक्रवर्ती, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे, विधी प्राधिकरण अधिकारी, संबंधित विविध विभागांचे अधिकारी आणि संबंधित तक्रारदार महिला उपस्थित होत्या.

या जनसुनावणीसाठी ६३ अर्ज आयोगाला प्राप्त झाले होते. राष्ट्रीय महिला आयोगाकडे नोंदणीकृत तक्रारी २८, वॉक इन मध्ये आलेल्या नवीन ३५ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातील २८ तक्रारांची सुनावणी पूर्ण झाली असून उर्वरित ३५ तक्रारांची सुनावणी येत्या ८ दिवसात निराकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तर काही प्रकरणे न्यायालयीन प्रक्रीयेत असल्यामुळे त्यांना थोडा वेळ लागू शकतो, मात्र बहुतांश तक्रारींमध्ये सकारात्मक परिणाम दिसून येईल, असा विश्वास आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रहाटकर यांनी व्यक्त केला.

या जनसुनावणीदरम्यान महिलांविरुद्धच्या विविध स्वरूपाच्या तक्रारींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. यामध्ये बलात्कार/बलात्काराचा प्रयत्न-१ प्रकरण, लैंगिक छळ-५ प्रकरणे, मारहाण-३ प्रकरणे, घरगुती हिंसाचार-१४ प्रकरणे, हुंडाबळी छळ-३ प्रकरणे, सायबर गुन्हे-१ प्रकरण आणि अपहरण-१ प्रकरण अशा विविध २८ तक्रारींवर प्रत्यक्ष कार्यवाही पूर्ण करुन सुनावणी घेण्यात आली.

दरम्यान, प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमुळे आणि प्रशासनाच्या आवाहनामुळे अजून ३५ महिलांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपल्या तक्रार नोंदवल्या असून, त्या प्रकरणांची सुनावणीही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. "या उर्वरित प्रकरणांमध्येही काही अॅट्रॉसिटी तसेच घरगुती हिंसाचाराच्या तक्रारी आहेत. विशेषतः २० ते २८ घरगुती हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये समुपदेशन व मध्यस्थीच्या माध्यमातून कुटुंबातील वाद मिटविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ठाणे, नवी मुंबई तसेच राज्य महिला आयोगाचे समुपदेशक आणि प्रोटेक्शन अधिकारी उपस्थित राहून कुटुंबांमधील वाद मिटविण्यासाठी समुपदेशन व मध्यस्थी प्रक्रिया राबवित असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, "महिलांच्या संरक्षणासाठी कायदे सक्षम आणि प्रभावी आहेत; मात्र त्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्थानिक पातळीवरील यंत्रणांनी वेळेत न्याय दिल्यास अशा विशेष उपक्रमांची गरज कमी भासेल. खालच्या स्तरावरील यंत्रणांमध्ये आढळणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी आयोग आवश्यक त्या सूचना देत आहे.

महिलांचा कायदा व प्रशासनावर विश्वास वाढविणे, ही अत्यंत महत्त्वाची बाब असून, अशा उपक्रमांमुळे महिलांना न्याय मिळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# 'पत्रकारांना २० लाखांचा विमा आणि विशेष प्रशिक्षण देणार'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार आणि माध्यम संघटनेने महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या पत्रकारांना २० लाखांचा विमा आणि विशेष प्रशिक्षण देण्याची घोषणा केली आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत चालणाऱ्या पत्रकार माध्यम संघटनेच्या तक्रार निवारण परिषदेचे अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी नवी मुंबई वाशी येथील मिनी पंजाब बँक्वेट हॉलमध्ये आयोजित या स्वागत समारंभ कार्यक्रमादरम्यान ही घोषणा केली.

जेएमएचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुमुखम पिल्लई, राज्य प्रभारी सुधीर शर्मा, नवनिर्वाचित महाराष्ट्र अध्यक्ष संजय निराळे, सरचिटणीस संजय पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष दत्तात्रय सूर्यवंशी, राज्य सल्लागार राजीव मोहन मिश्रा आणि सुचिता बिराजदार, उपाध्यक्ष कमर शाह, लालचंद यादव यांच्यासह मोठ्या संख्येने जेएमएचे सदस्य उपस्थित होते.

विशेष अतिथी म्हणून बोलताना, उपमहापौर दशरथ भगत यांनी प्रसारमाध्यमांच्या आव्हानात्मक परिस्थितीचा उल्लेख केला आणि पत्रकार माध्यम संघटनेची सकारात्मक मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश आणि सरचिटणीस अरुमुखम पिल्लई यांनी महाराष्ट्रात जेएमएची स्थापना आणि विस्तारासाठी कार्यरत असलेल्या राज्य प्रभारी सुधीर शर्मा यांच्या सकारात्मक प्रयत्नांना प्रोत्साहन दिले.

छापील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये डिजिटल पत्रकारिता अधिक व्यापक आणि प्रभावी होत आहे, परंतु ऑनलाईन माध्यमांना छापील आणि टीव्ही माध्यमांइतका पाठिंबा मिळत नाही. राष्ट्रीय अध्यक्षांनी सांगितले की, जेएमए एक सहकारी संस्था सुरू करत आहे, ज्याद्वारे पत्रकारांना कोणत्याही त्रासाशिवाय कर्ज आणि आर्थिक मदत मिळू शकेल. त्याचबरोबर, संस्थेशी संबंधित माध्यम कर्मचाऱ्यांना किमान प्रीमियमवर २० लाखांपर्यंतचा अपघाती विमा मिळेल आणि दर तीन महिन्यांनी पत्रकारिता व सुरक्षेचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी सांगितले की, पत्रकार माध्यम संघटना देशातील विविध राज्यांमधील ऑनलाइन पत्रकारांना ओळख, सुरक्षा आणि सुविधा देण्यासाठी भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयासोबत सातत्याने काम करत आहे. त्यांनी केवळ यूट्यूबवर बातम्या देणाऱ्यांना सावध केले आणि सांगितले की ही कायदेशीर पत्रकारिता नाही, त्यामुळे डोमेन घेणे आवश्यक आहे, तरच त्यांना डिजिटल पत्रकार म्हणून गणले जाईल. त्यांनी सांगितले की, जेएमएजीसी मार्फत अशा ऑनलाइन माध्यमांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यांनी असंघटित माध्यमांना जेएमएमध्ये सामील होण्याचे आवाहन केले आणि महाराष्ट्र युनिटला सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

जर्नलिस्ट मीडिया असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष संजय निराळे यांनी आश्वासन दिले की, ते सरचिटणीस संजय पवार आणि कार्यकारी अध्यक्ष विनायक गुलगुले यांच्यासह महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जेएमए पर्यंत पोहचतील. त्याचवेळी, राज्य प्रभारी सुधीर शर्मा यांनी विश्वास व्यक्त केला की, राष्ट्रीय अधिकाऱ्यांशी थेट संवादाचा हा कार्यक्रम डिजिटल पत्रकारितेची सद्यस्थिती आणि त्यापुढील आव्हाने समजून घेण्यासोबतच काहीतरी नवीन शिकण्यासाठी उपयुक्त ठरेल. जेएमएची डिजिटल आणि ऑनलाइन पत्रकारांसाठीची आर्थिक सहाय्य योजना उपेक्षित आणि पीडित पत्रकारांना सक्षम करण्यास मदत करेल.

# नेरे येथील वृद्धाश्रमात गाण्यांचा कार्यक्रम सादर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साई आश्रया वृद्धाश्रम, नेरे, पनवेल येथे १८ एप्रिल रोजी एक बहारदार मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. हा कार्यक्रम सिद्धकला सुगम संगीत वर्गाच्या संचालिका तृप्ती मानकामे व साई आश्रया वृद्धाश्रमाचे संस्थापक, हितचिंतक किरण पाटील व ज्योती पाटील तसेच गायक संजय गोडसे यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आला.

या कार्यक्रमात तृप्ती मानकामे व संजय गोडसे यांनी अनेक नामांकित हिंदी गाणी सादर केली तसेच सिद्धकला सुगम संगीत वर्गाच्या विद्यार्थिनी डॉ. कांचन जनार्दन, माधवी माने, सरीता ताई, कुंदा म्हात्रे, स्मिता अंजर्लेकर, अमृता मालणकर, माधुरी चौधरी व मीनल रणदिवे यांनीदेखील गीते सादर केली.

कार्यक्रमाचे निवेदन मीनल रणदिवे यांनी केले. यावेळी अनेक वृद्ध मंडळींचे पाय गाण्याच्या तालावर थिरकू लागले. सिद्धकला वर्गातर्फे वृद्धांना खाऊ वाटण्यात आला.



# नरेंद्राचार्य महाराजांच्या मोफत ॲम्ब्युलन्स सेवेची अपघातग्रस्तांसाठी मदत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बांदलवाडी मुंबई-गोवा महामार्गावर दोन बाईक सामोरा समोर धडकून अपघात घडला. या अपघातात बाईक चालक धनंजय हरिश्चंद्र म्हात्रे, वय २५ वर्षे तसेच दुसरे बाईक चालक अभिजित दादाभाई पाटील, वय ३६ यांच्या हातापायाला व जबड्याला जबर मार लागून दोन्ही बाईक चालक गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच पळस्पे-कर्नाळा खिंड येथून २४ तास सेवा देणारी मोफत रुग्णवाहिका तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या या सेवेमार्फत जखमीस तत्काळ



वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली.

रुग्णवाहिकद्वारे जखमीस ओम साई हॉस्पिटल, पेण येथे दाखल करण्यात आले. वेळेवर उपचार मिळाल्यामुळे जखमीच्या प्रकृतीत सुधारणा होण्यास मदत झाली आहे. या रुग्णवाहिकेचे चालक विश्वास पाटील यांनी तत्परतेने सेवा बजावत जखमीस सुरक्षितपणे रुग्णालयात पोहचवीले.

रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या विनामूल्य ॲम्ब्युलन्स सेवेतून आतापर्यंत ३२८४० अपघातग्रस्तांना वेळीच मदत करून त्यांचे प्राण वाचविण्यात आले आहेत. जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानची रायगड मधील अँम्ब्युलन्स कर्नाळा खिंड, विट्टल कामत हॉटेल जवळ महामार्गावरील अपघात ग्रस्तांच्या सेवेसाठी विनामूल्य तैनात करण्यात आली आहे, महामार्गावरील अपघात ग्रस्तांच्या विनामूल्य सेवेसाठी पुढील क्रमांकावर संपर्क करावा. ८८८८२६३०३० / ८३२९४२५९०८ असे आवाहन करण्यात आले आहे.

# मांडवा येथे साकारणार मरिना प्रकल्प

## आराखडा तयार करण्याचे मंत्री नितेश राणे यांचे निर्देश | आमदार महेंद्र दळवी यांनी केली होती मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मांडवा येथे लवकरच मरिना प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे पंधराशे कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. येत्या आठ दिवसांत या प्रकल्पाचा आराखडा तयार होऊन टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे, असे निर्देश राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.



मांडवा परिसरात सध्या बोटी उभ्या करण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने भरती-ओहोटीच्या काळात मोठ्या अडचणी निर्माण होतात. वाढते पर्यटन आणि तालुक्याचा विकास लक्षात घेता जेट्टीजवळ मरिना उभारण्याची मागणी आमदार आमदार महेंद्र दळवी यांनी केली होती. या मागणीची दखल घेऊन मंत्री राणे यांनी मंगळवारी मंत्रालयात विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती.

या बैठकीत मांडवा येथील मरिना उभारणीबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. अखेरीस अत्याधुनिक 'मरिना' उभारण्याचा निर्णय निश्चित करण्यात आला. मंत्री राणे यांनी या प्रकल्पाचा आराखडा तातडीने तयार करून पुढील १५ दिवसांत कामाची निविदा निघाली पाहिजे, असे स्पष्ट निर्देश दिले.

मांडवा येथे मरिना उभारण्यात आल्यास छोट्या प्रवासी बोटी, यॉट्स आणि लहान जहाजांसाठी सुरक्षित बंदर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पर्यटन, रोजगारनिर्मिती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे तसेच पायाभूत सुविधांचा विकास होऊन मांडवा हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बंदर म्हणून ओळख निर्माण करू शकते.

# खासदार सुनील तटकरे यांनी केली रोहा स्टेशनची पाहणी

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे शेवटचे स्थानक असलेले व जिथून कोकण रेल्वे सुरुवात होते त्या रोहा रेल्वे रेल्वे स्टेशनची अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत काम सुरू आहे. खा सुनील तटकरे यांनी रोहा रेल्वे स्थानक व परिसराची पाहणी केली. प्रवासी व नागरिकांच्या समस्या समजून घेतल्या.रेल्वे स्थानक पाहणी दरम्यान त्यांच्या समवेत माजी आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजय कुमार एडके, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, गट नेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, मयूर दिवेकर, नीता हजारे, रवी चाळके, नगरसेवक



## अमृत भारत स्टेशन अंतर्गत रेल्वेस्थानक होणार सुसज्ज

प्रशांत कडू, अजित मोरे, रिक्षा संघटना अध्यक्ष लीलाधर मोरे, प्रवासी संघटना अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, सोपानराव मोहीते आदिसह मध्य रेल्वे व कोकण रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत रोहा रेल्वे स्थानकात सुरू असलेल्या विविध विकासकामांची खा. सुनील तटकरे यांनी भेट देऊन पाहणी केली. या पाहणीदरम्यान स्थानकातील सध्याच्या सुविधा, प्रवाशांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच भविष्यातील वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून आवश्यक सुधारणा आणि विस्तारकामांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत सखोल चर्चा केली.

प्रवाशांना अधिक चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात, प्लॅटफॉर्मची क्षमता वाढवावी, स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, तसेच स्थानक परिसराचे सुशोभीकरण करून आधुनिक, आकर्षक आणि सुलभ असे स्थानक विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला. ही सर्व कामे गतीने आणि निर्धारित कालावधीत दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# रोहा तालुका पंचक्रोशी लिंगायत जंगम समाजाने दफनभूमी प्रश्नासाठी घेतली खासदार तटकरे यांची भेट



**रोहा : प्रतिनिधी**

लिंगायत जंगम समाजाच्या रोहा शहर व भुवनेश्वर येथील दफनभूमीचा प्रश्न सोडवण्यासाठी रोहा तालुका पंचक्रोशी जंगम समाजाने खासदार सुनील तटकरे यांची सुतारवाडी येथील निवासस्थानी भेट घेतली.

यावेळी माजी आ. अनिकेत तटकरे, उपाध्यक्ष मनोहर स्वामी, जंगम संघटना रायगड समन्वयक विनोद स्वामी, महादेव सरसंबे, महिला मंडळ अध्यक्ष प्रिया जंगम, ज्येष्ठ नेते महादेव स्वामी, रमेश स्वामी, रघुनाथ स्वामी, काशिनाथ स्वामी, मारुती स्वामी, राजेंद्र स्वामी, प्रमोद स्वामी, सागर स्वामी, निलेश स्वामी, महिला मंडळ अध्यक्ष प्रिया जंगम, विद्या जंगम, विजया सरसंबे, रूपाली जंगम आदी उपस्थित होते.

रोहा शहर व भुवनेश्वर येथे लिंगायत जंगम व अन्य लिंग समाजातील समाज बांधवांना दफनभूमीचा प्रश्न सातत्याने भेडसावत होता शासन दरबारी या संबंधित पत्रव्यवहार हे करण्यात आले होते, परंतु हा प्रश्न सुटत नव्हता. त्यामुळे हा प्रश्न सोडवण्यासाठी रोहा तालुका पंचक्रोशी जंगम समाजाच्या वतीने खासदार सुनील तटकरे यांची भेट घेतली व आपल्या समस्यांबाबत त्यांना सांगितले. खासदार सुनील तटकरे यांनी हा प्रश्न लक्षात घेत तो सोडवण्यात येईल असे आश्वासन दिले.

रोहा ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे रोहा तालुक्यातील शासनाच्या विविध विभागाची आढावा बैठक खा.सुनील तटकरे यांनी बोलवली होती. या बैठकीत लिंगायत जंगम समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न मांडण्यात आले होते. खासदार सुनील तटकरे यांनी लिंगायत जंगम समाजाच्या दफनभूमीचा प्रश्न सोडवण्यासाठी तहसीलदार किशोर देशमुख व मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांना लक्ष देण्यास सांगितले.

# श्रीवर्धन पोलिसांच्या ड्रोनची डोंगरपट्ट्यावर नजर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात गेल्या महिन्यात विठ्ठल आळी व पोद्दार चाळ परिसरात घडलेल्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अज्ञात चोरट्यांनी घरांचे कडी-कोयंडे तोडून चोरी केल्याने स्थानिकांनी स्वसंरक्षणाच्या दृष्टीने रात्रीची गस्त सुरू केली. सायंकाळी व रात्री संशयास्पद हालचाली दिसत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी चोरट्यांचा पाठलाग केल्यावर ते डोंगराच्या दिशेने पळून जात असल्याचे निदर्शनास आले. यावरून पोलिसांनी प्राथमिक अंदाज व्यक्त केला की, चोरटे डोंगरपट्ट्यात तात्पुरते वास्तव्य करत असावेत किंवा सायंकाळी डोंगरमार्गे खाली उतरून गुन्हे करत असावेत.

या सर्व घटनांची दखल घेत श्रीवर्धन पोलिसांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत ड्रोन कॅमेऱ्याद्वारे डोंगर परिसरात सायंकाळ व रात्री निगराणी सुरू केली आहे. जीवना बंदर डोंगर पट्ट्यात ड्रोनद्वारे पाहणी करण्यात आली असून अद्याप कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्या नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जीवना कोळीवाडा परिसरात गेल्या चार-पाच दिवसांपासून चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याच्या चर्चा नागरिकांमध्ये सुरू होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक गरड व त्यांच्या सहकारी कदम यांनी नागरिकांशी संवाद साधत परिस्थितीचा आढावा घेतला.

## अंडा पॉंइंटजवळ टेम्पो उलटला; वाहतूक ठप्प

**खालापूर :** मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील अंडा पॉईंटजवळ आयसर टेम्पो ब्रेक फेल झाल्याने पलटी झाला.

महामार्गावरून काल रात्री ८ वा सुमारास आयसर टेम्पो क्रमांक (MH ४६ BM ४५७५) हा चालक सुधाकर साळुंखे (वय ५४ रा घाटकोपर मुंबई) पुण्याहून मुंबईकडे घेऊन जात असताना तो दस्तुरी येथील तीव्र उतारावर आला असता टेम्पोचे ब्रेक फेल झाल्याने अंडा पॉईंट येथील वळणावर पलटी झाला. चालकाला तत्काळ बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले. क्रेनच्या साहाय्याने टेम्पो रस्त्याच्या बाजूला घेऊन रस्ता वाहतुकीसाठी चालू करण्यात आला आहे.



# 'सामाजिक समतेचा संदेश देत महात्मा बसवेश्वरांनी श्रमाला महत्त्व दिले'



**रोहा : प्रतिनिधी**

१२व्या शतकात सामाजिक समतेचा संदेश श्री महात्मा बसवेश्वर यांनी दिला. कर्मकांडातून समाजाला बाहेर काढीत श्रमाला त्यांनी महत्त्व दिले. त्यांचे विचार आजही समाजाला प्रेरणादायी असल्याचे ओबीसी जनमोर्चा जिल्हाध्यक्ष तथा रोहा पंचायत समिती सदस्य सुरेश मगर यांनी रोहा पंचायत समिती येथे ज्ञानज्योती, समतानायक, क्रांतीसुर्य श्री महात्मा बसेश्वर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

यावेळी रोहा पंचायत समिती कृषी विस्तार अधिकारी रणजीत लवाटे, पुढारी उपसंपादक महादेव सरसंबे, कामगार नेते चंद्रकांत भगत, निवृत्त पोलीस अधिकारी संदीप मोहिते, सोमनाथ स्वामी, किरण स्वामी, पंचक्रोशी जंगम समाज महीला मंडळ अध्यक्ष प्रज्ञा जंगम, युवा नेते आशिष जंगम, राजेंद्र जंगम, सिद्धराम कोरे, श्रीकांत जंगम, विद्या जंगम, विजया सरसंबे, सुखदा जंगम, साहील जंगम, निखील सरसंबे आदी उपस्थित होते.

यावेळी महादेव सरसंबे यांनी श्री महात्मा बसवेश्वर यांचे विचार जागतिक स्तरावर रुजले आहेत. १२ शतकात श्री महात्मा बसेश्वर यांनी कोणताही भेदभाव न मानता आपण सर्व एकच आहोत असा संदेश दिला.

यावेळी प्रास्ताविकात रणजीत लवाटे यांनी श्री महात्मा बसवेश्वर यांनी समाज क्रांती केली असे सांगत त्यांच्या जीवन चरित्र संक्षिप्तपणे सांगितले.

यावेळी रोहा पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी व लिंगायत जंगम समाज उपस्थित होता.

# पर्यावरणाची पुस्तकबाग उपक्रमाचे उद्घाटन

**महाड : प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षकांसह विद्यार्थ्यांसमोर विविध शैक्षणिक आव्हाने उभी ठाकलेली असताना त्यांना केवळ शिक्षित न करता सुसंस्कृत व पर्यावरणप्रेमी नागरिक बनवणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन दि. अण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड, महाडचे संचालक शिवराज सावंत यांनी केले. ते रंगसुगंध व श्रीमती शशिकला शंकरराव सावंत स्मारक वाचन मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पर्यावरणाची पुस्तकबाग या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून रंगसुगंध संस्थेमार्फत बालगोपाळांसाठी 'पुस्तकबाग' हा उन्हाळी उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना नैसर्गिक वातावरणात वाचन संस्कृतीचे धडे देण्याबरोबरच खेळ, संस्कृती, परंपरा, कौशल्य, अर्थकारण, भटकंती आणि पर्यटन यांचा आनंद पूर्णतः विनामूल्य दिला जातो. यंदा शैक्षणिक सत्राला झालेल्या विलंबामुळे काही शाळांच्या वार्षिक परीक्षा



अद्याप सुरू असल्याने या उपक्रमासाठी मर्यादित कालावधी उपलब्ध झाला आहे. कार्यक्रमादरम्यान वलंग हायस्कूलमध्ये विद्यार्थी दशेत शिक्षण घेतलेल्या आणि सध्या त्याच शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या गंगाधर साळवी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

रविवार, १९ एप्रिल २०२६ रोजी शहरातील हुतात्मा स्मारक येथे झालेल्या उद्घाटन सोहळ्यास शिवराज सावंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भुस्कुटे, शशिकला सावंत स्मारक वाचन मंदिर उपाध्यक्ष संदीप शेठ, वलंग हायस्कूल मुख्याध्यापक गंगाधर साळवी, कोमसाप महाड उपाध्यक्षा प्रिया शहा, रंगसुगंध अध्यक्ष सुधीर शेठ तसेच नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती गीतांजली महाडिक, नगरसेवक हेमंत चांदलेकर, नगरसेविका अक्षया हेलेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात हुतात्म्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.

आपल्या मनोगतात शिवराज सावंत यांनी 'पुस्तकबाग' या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "पुस्तक आणि बाग या दोन संकल्पनांचा संगम म्हणजे 'पुस्तकबाग'. बाग म्हणजे निसर्ग, खेळ आणि आनंद, तर पुस्तक म्हणजे ज्ञान व विचारांची समृद्धी. या दोन्हींचा मेळ घालणे कठीण असले तरी रंगसुगंध संस्था हे कार्य अनेक वर्षांपासून यशस्वीपणे करीत आहे, ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे."

"पुस्तकासारखा मित्र नाही आणि निसर्गासारखा देव नाही. या दोघांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांनी जीवनातील आव्हानांना सामोरे जावे," अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच वर्षभर शालेय स्तरावर 'माझा कोपरा' या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना केली. यावेळी प्रभाकर भुस्कुटे, गंगाधर साळवी, संदीप शेठ, प्रिया शहा, हेमंत चांदलेकर आणि गीतांजली महाडिक यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत रंगसुगंध संस्थेच्या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर शेठ यांनी केले. सूत्रसंचालन मयूर धामणकर यांनी तर आभार प्रदर्शन योगेश देवघरकर यांनी केले.

# पडम येथे जाखमाता देवीचा पालखी सोहळा उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पडम गावाचे ग्रामदैवत श्री जाखमाता देवीची पालखी मिरवणूक व वार्षिक उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पडम ग्रामस्थांनी साजरा केला आहे.

पडम हे संपूर्ण गाव कोळी समाजाचे असून ते उत्सव प्रिय आहे. श्री जाखमाता देवी पालखी सोहळा पडम गावासाठी उत्सवाचा दिवस असतो. श्री जाखमाता पालखी उत्सव व वार्षिक सोहळा निमित्ताने संपूर्ण पडम गाव हे सजले होते. गावात रंग रंगोटी, पताका, विद्युत रोषणाई करण्यात आली होती. महिलांनी आपल्या दारासमोर सडा रांगोळी काढण्यात आली होती. पडम ग्रामस्थ कामानिमित्ताने मुंबई व अन्य शहरात राहणारे पालखी निमित्ताने ते आपले गावी आले होते. जाखमता देवी पालखी उत्सव निमित्ताने दिवसभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम ठेवण्यात आले होते.





सकाळपासूनच ग्रामस्थांची उत्सवानिमित्ताने रिलेशन चालू होती. सकाळी ७ ते ९.३० दरम्यान मुखवटा मिरवणूक काढण्यात आली होती. १० ते ११ अभिषेक, हळदी कुंकू असे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. दिवसभर घरामध्ये महिलांनी गोडधोड पकवान केले होते.

सायंकाळी ६ च्या सुमारास श्री जाखमाता देवी पालखी उत्सवात सुरुवात झाली. गावातील ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, युवक व बालगोपाळाचे वयोवृद्ध पर्यंत सगळ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून पालखी उत्सवात सहभागी झाले होते. पारंपारिक खालुबाजा व पाश्चिमात्य वाद्यवृंदावर ग्रामस्थ ठेका धरताना दिसत होते. गुलालाची उधळण मातेचा गजराने संपूर्ण परिसर भक्तीमय झाले होते. प्रत्येकाच्या दारासमोर पालखी गेल्यावर मातेचे दर्शन घेऊन भाविक आरती ओवाळताना दिसत होते.

# आदर्श बचतीतून प्रगतीचा प्रेरणादायी संदेश

मुरूड-जंजिरा तालुक्यातील बोर्ली गावातील १२ महिलांनी एकत्र येत १० जून २०१५ रोजी लकी महिला स्वयं-सहाय्यता समूहाची स्थापना केली. सुरुवातीला केवळ मासिक बचत जमा करणे व गरजूंना अंतर्गत कर्ज देणे एवढ्यापुरते मर्यादित असलेले हे कार्य आज आर्थिक स्वावलंबनाचा आदर्श ठरले आहे. बचतीच्या सवयीमुळे महिलांमध्ये एकजूट, विश्वास आणि परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागली. यासोबतच स्वच्छता अभियान, पोषण महा सप्ताह आणि कोविड-१९ काळात जनजागृती करून समूहाने सामाजिक बांधिलकीही जपली.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत समूहाचा समावेश झाल्यानंतर त्यांच्या कार्याला नवी दिशा मिळाली. विविध योजना, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनामुळे समूह अधिक सक्षम झाला. MIS नोंदणी, फिरता निधीचा लाभ आणि २०१९ मध्ये नारीशक्ती महिला ग्रामसंघाशी जोडणी यामुळे समूहाची प्रगती वेगाने झाली.

व्यवसायाच्या दृष्टीने सुरुवातीला महिलांनी घरगुती उपक्रम जसे कपडे शिवणे, चपाती-भाकरी बनविणे, घरगुती पदार्थ विक्री यावर भर दिला. त्यातून उत्पन्न वाढत गेले आणि महिलांचा आत्मविश्वास उंचावला. पुढे व्यवसाय विस्तारासाठी समूहाने २०१६ मध्ये रु.२ लाख आणि २०१८ मध्ये रु.४ लाख असे बँक कर्ज घेतले. कर्जाची वेळेवर परतफेड करून त्यांनी बँकेचा विश्वास संपादन केला. या निधीतून प्रत्येक सदस्याने स्वतःचा व्यवसाय सुरू करून कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत हातभार लावला.

आज समूहातील महिला सॅनेटरी नॅपकिन विक्री (अस्मिता योजना), बिर्याणी व घरगुती पदार्थ विक्री, मेंहदी कोन तयार करणे, कपडे शिवणे, खानावळ व चपाती बनविणे अशा विविध व्यवसायांमध्ये सक्रिय आहेत. त्यांच्या एकजुटीमुळे, मेहनतीमुळे आणि व्यवसायिक दृष्टीकोनामुळे समूहाने उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

एकत्रित प्रयत्न, नियमित बचत, व्यवसाय करण्याची जिद्द आणि उमेद अभियानाचे मार्गदर्शन या बळावर लकी महिला स्वयं-सहाय्यता समूहाने यश संपादन केले आहे. हा समूह ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचा उत्तम आदर्श ठरून "बचतीतून प्रगती"चा प्रेरणादायी संदेश देत आहे.

**-मनोज सानप,**
रायगड जिल्हा माहिती अधिकारी

# हैदराबादचा दिल्लीवर शानदार विजय

## अभिषेक शर्माचे शतक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अभिषेक शर्माच्या विक्रमी शतकी खेळीनंतर एशान मलिंगा आणि हर्ष दुबे यांनी अचूक टप्प्यावर केलेल्या गोलंदाजीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादच्या संघाने घरच्या मैदानात दिल्ली कॅपिटल्सला ४७ धावांनी पराभूत केले. ऑरेंज आर्मीने सेट केलेल्या २४३ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सकडून नितीश राणाच्या अर्धशतकाशिवाय समीर रिझवी वगळता कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. परिणामी अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील संघ निर्धारित २० षटकांत ९ बाद १९५ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

यंदाच्या हंगामातील सातव्या सामन्यातील चौथ्या विजयासह सनरायझर्स हैदराबादचा संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे, तर दिल्ली कॅपिटल्स संघ सहा सामन्यातील चार विजयासह आठ गुण खात्यात जमा करत पाचव्या स्थानावर आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करताना हैदराबादच्या मैदानात अभिषेक शर्मा नावाचे वादळ घोंगावले. या पठ्ठ्याने दिल्लीकरांची धुलाई करताना १० चौकार आणि १० षटकाराच्या मदतीने ६८ चेंडूत १३५ धावांची खेळी केल्या. ट्रॅविस हेटने २६ चेंडूत ३७ धावा केल्या. अक्षर पटेल याने त्याची विकेट घेतली. हैदराबादचा कर्णधार ईशान किशन १३ चेंडूत २५ धावा करून धावबाद झाल्यावर हेन्री क्लासेन याने १३ चेंडूत तीन षटकार आणि तीन चौकाराच्या मदतीने नाबाद ३७ धावांचे योदान देत संघाच्या धावफलकावर २ बाद २४२ धावा लावल्या होत्या.

सनरायझर्स हैदराबादच्या संघाने दिलेल्या या धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सने अवघ्या २१ धावांवर पहिली विकेट गमावली. पथुमन निसंका आठ धावा करून माघारी फिरला. मदुशंकाने त्याची विकेट घेतली. केएल राहुल आणि नितीश राणा जोडीने दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करत संघाचा डाव सावरला, पण साकीब हुसेन याच्या गोलंदाजीवर अभिषेक शर्माने केएल राहुलचा अप्रतिम झेल टिपत संघाला महत्त्वपूण विकेट मिळवून दिली. लोकेश राहुल ३७ धावांवर बाद झाला. त्यानंतर नितीश राणाने ३० चेंडूत ५७ धावांची खेळी केली. समीर रिझवीने २८ चेंडूत केलेल्या ४१ धावा आणि लोअर मिडल ऑर्डरमध्ये ट्रिस्टन स्टब्सने २७ (१६) आणि आशुतोष शर्मा १४ (१०) याशिवाय कोणत्याही फलंदाजाला द्विशतकी आकडा गाठता आला नाही. परिणामी दिल्ली कॅपिटल्सचा संघ निर्धारित २० षटकात १९५ धावांवरच अडखळला.

सनरायझर्स हैदराबादच्या संघाकडू गोलंदाजीत एशान मलिंगा याने सर्वाधिक चार, तर हर्ष दुबेने तीन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. याशिवाय मदुशंका आणि साकिब हुसेन यांनी प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

# असीम मुल्ला 'मुरूड श्री'चा मानकरी

## संस्कार आंबुकर बेस्ट पोझर



**मुरूड : प्रतिनिधी**

ऐके फिटनेस आणि श्री मेन फिजिक मुरुड आयोजित शरीरसौष्ठव स्पर्धा २०२६ बजरंगी व्यायामशाळेचे संस्थापक आशिष खोत यांनी मुरूड समुद्रकिनाऱ्याजवळ आयोजित केली होती. या स्पर्धेत असीम मुल्ला याने मुरूड श्री २०२६ हा किताब पटकावला.

स्पर्धेत मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा तालुक्यातील एकूण ४० स्पर्धेकांनी भाग घेतला होता. मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, तर नगरसेवक आदेश दांडेकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

यावेळी नगरसेवक रूपेश पाटील, आदेश दांडेकर, आशिल हेदुळकर, राष्ट्रीय पंच परशुराम चव्हाण, शाम धाटावकर, किरण भगत, राजेश गुप्ते, गजानन पाके, माजी राष्ट्रीय पंच मोहन करंदेकर, बाबी ठाकूर आदींसह अनेक तरुण उपस्थित होते. मेन फिजिक भारत श्री सुवर्णपदक विजेत्या बॉबी पाटील यांनी शो पोजिंग दाखवून युवावर्गाला उत्साहित केले.

मुरूड श्री किताब विजेत्या असीम मुल्ला याला १५ हजार रोख व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. उपविजेता नांदगाव येथील अजय दिवकर ठरला. त्याला पाच हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. मेन फिजीक विजेता कैफ कारभारी (तीन हजार रुपये व ट्रॉफी, उपविजेता सुर्या गाणार (२५०० रुपये व ट्रॉफी) आणि तृतीय क्रमांक विजेता आदित्य किल्लेकर (दोन हजार रुपये व ट्रॉफी) यांनाही बक्षीस देण्यात आले. त्याचप्रमाणे बेस्ट पोझर संस्कार आंबुकर (दोन हजार रु. व ट्रॉफी) उगवता तारा सुर्या गाणार (१५०० रु. व ट्रॉफी) यांचाही गौरव केला गेला.

# सूर्यकुमार यादवनंतर कोण होणार टी-२० संघाचा कर्णधार?



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाने सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना २०२६ टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. यात सूर्यकुमारने कर्णधार म्हणून उत्तम निर्णय घेतले. पण फलंदाजीत एकही सामन्यात तो मोठी खेळी करू शकला नव्हता. त्यानंतर आता आयपीएल स्पर्धेतही त्याची बॅट शांतच आहे.

जर खराब फॉर्ममुळे सुर्यकुमार भारतीय संघातून बाहेर पडला, तर त्याच्या जागी श्रेयस अय्यर हा कर्णधारपदासाठी प्रबळ दावेदार आहे. यासह इशान किशन आणि शुबमन गिलदेखील कर्णधारपदाच्या शर्यतीत आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला १८ वर्षांनंतर पहिली ट्रॉफी जिंकून देणाऱ्या रजत पाटीदारने कर्णधार म्हणून दमदार कामगिरी केली आहे, पण त्याला आतापर्यंत टी -२० संघासाठी पदार्पण करण्याची संधी मिळालेली नाही. गिल सध्या कसोटी आणि वनडे संघाचा कर्णधार आहे. टी-२० वर्ल्डकपसाठी निवडलेल्या संघात गिलला संघात स्थान मिळणार अशी चर्चा होती, पण त्याला संघाबाहेर करण्यात आले. त्याच्या जागी इशानचा संघात समावेश करण्यात आला होता. आयपीएलच्या गेल्या काही हंगागांमध्ये श्रेयसने कर्णधार आणि फलंदाज म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे. श्रेयसकडे अनुभवदेखील आहे. त्यामुळे कर्णधार बनण्याच्या शर्यतीत तो सर्वात पुढे आहे.

# श्री धापया महाराज कुस्ती आखाड्यात रंगतदार लढती

## पुण्याचा आदित्य कांबळे अजिंक्य



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराजांच्या उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी शंभरहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती पुण्याचा आदित्य कांबळे आणि कल्याणचा प्रतिक भंडारी यांच्यात झाली. प्रतिकला काही सेकंदातच आदित्यने चीतपट केल्याने तो अजिंक्य ठरला.

पहिल्या सत्रातही आदित्य कांबळे प्रक्षकांच्या गळ्यातील ताईत ठरला, पण पहिल्या सत्रातील आखाडा विजेता म्हणून मानाची गदा कर्जत तालुक्यातील हेदवली गावातील सूरज जोशी या पहेलवानाने मिळवली. मध्यरात्रीपर्यंत हा कुस्ती आखाडा रंगला.

धापया आखाड्यात सकाळी नऊ वाजल्यापासून स्थानिक स्थानिक कुस्तीगीरांमध्ये लढती होऊन कुस्त्यांना प्रारंभ झाला. धापया देवस्थान समितीचे अध्यक्ष गणेश शिंदे यांच्या हस्ते कुस्त्यांचा शुभारंभ करण्यात आला. रायगड जिल्हा व कर्जत तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी दीपक भुसारी, प्रकाश आणेकर, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, सचिन दगडे, गौरव भानुसघरे, वसंत पवार, व्यंकटेश ठाकरे, मलेश भोईर, हेमंत पवार आदी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात ३४, तर दुपारच्या सत्रात तब्बल ७६ अशा एकूण तब्बल ११० कुस्त्या झाल्या. हा आतापर्यंतचा येथील विक्रम मानला जातोय. अंतिम कुस्ती पुण्याचा आदित्य कांबळे आणि कल्याणचा प्रतिक भंडारी यांच्यामध्ये झाली. ही कुस्ती कर्जतचे प्रथम नगराध्यक्ष व श्री धापया देवस्थानाचे माजी अध्यक्ष स्व. रमेश चंदन यांच्या स्मरणार्थ त्यांचे पुत्र प्रसाद चंदन यांनी ठेवली होती. त्यासाठी सर्व मिळून ३६ हजार रुपयांचे भरघोस पारितोषिक होते. ही कुस्ती आदित्य कांबळे यांनी काही सेकंदात कल्याणच्या प्रतिक भंडारीला चीतपट करीत जिंकली. त्याला ३६ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि रायगड जिल्हा कुस्तीगीर अध्यक्ष भगवान धुळे यांनी गदा देऊन सन्मानित केले.

दानशुरांनी संपूर्ण दिवसात झालेल्या कुस्त्यांना रोख बक्षीसे जाहीर केली. महिलांच्या पाच कुस्त्या झाल्या. त्यासुद्धा लक्षवेधक ठरल्या. दोन्ही सत्रात पंच म्हणून दीपक भुसारी, दत्तात्रय म्हसे, रमेश लोभी यांनी काम पाहिले.

यावेळी ज्येष्ठ कुस्ती पंच दत्तात्रेय पालांडे, हरिश्चंद्र कांबेरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सचिन दगडे, दिलीप ठाकरे आणि समीर सोमणे यांनी संपूर्ण दिवस सर्व कुस्त्यांचे समालोचन केले. या आखाड्यात रोख पारितोषिके देण्यासाठी नगरसेवक महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, योगेश गायकवाड, मंगेश देशमुख, साईनाथ दराडे, राजेंद्र दगडे, अमित गुप्ता, पंकज बडेकर, प्रसाद चंदन, गणेश शिंदे, सौरभ निगुडसे, राहुल देशमुख, नितीन गुप्ता, राहुल शिंदे, अरुण गुप्ता, सौरभ म्हसे, सोनू जोशी आदींनी सहकार्य केले.

प्रकाश आणेकर, राजेंद्र दगडे, पप्पू गुरव, दिनेश निगडूसे आदींच्या हस्ते जिंकलेल्या कुस्तीगिरांना पारितोषिके देण्यात आली. यावेळी राज्यभरातील मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर, धाराशिव, हिंगोली, नाशिक, लातूर, अहिल्यानगर आदी भागांतून आलेले पहेलवान स्पर्धेत सहभागी झाले होते. कर्जत तालुक्याच्या ग्रामीण भागातून आलेले असंख्य कुस्तीप्रेमी उपस्थित होते तसेच नगरसेवक कुमेश मोरे, राजाभाऊ कोठारी यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली.

# अभिषेक शर्माची विक्रमी शतकी खेळी

## ख्रिस गेल, ॲरॉन फिंचला टाकले मागे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा याने यंदाच्या हंगामातील पहिले आणि आयपीएलमधील दुसरे शतक साजरे केले. दिल्लीकरांची धुलाई करताना अभिषेकने १० चौकार आणि १० षटकाराच्या मदतीने नाबाद १३५ धावांची खेळी साकारली. यासह त्याने ख्रिस गेल आणि ॲरॉन फिंच या दिग्गजांना धोबीपछाड देत टी-२० क्रिकेटमध्ये नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.

कॅरेबियन स्टार गेल आणि ऑस्ट्रेलियन दिग्गज फिंच यांनी आपल्या टी-२० कारकिर्दीत तीन वेळा १३० किंवा त्यापेक्षा अधिक धावा केल्याचा रेकॉर्ड होता. अभिषेक शर्माने चौथ्यांदा ही कामगिरी करून दाखवत नवा इतिहास रचला आहे. टी-२० क्रिकेटमध्ये चार वेळा १३०पेक्षा अधिक धावा करणारा तो जगातील पहिला आणि एकमेव फलंदाज ठरलाय.

सनरायझर्सचा हुकमी एक्का असलेल्या अभिषेक शर्माने गत हंगामात पंजाब किंग्सविरुद्ध आयपीएलमधील पहिले शतक झळकाले होते. या सामन्यात त्याने १४१ धावा केल्या होत्या. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध त्याने १३५ धावांची नाबाद खेळी साकारली. याशिवाय सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत त्याने पंजाबकडून खेळताना बंगालविरुद्ध ५२ चेंडूत १४८ धावांची खेळी केली होती. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध १३५ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे.

### कोहली, डी कॉकशी बरोबरी

अभिषेक शर्माने दिल्ली कॅपिलटल्सविरुद्ध आयपीएलमधील दुसरे तर टी-२० कारकिर्दीतील नववे शतक ठोकले. या खेळीसह त्याने विराट कोहली, क्विंटन डी कॉक यांच्या खास विक्रमाशी बरोबरी केली. आहे. टी-२०मध्ये सर्वाधिक शतके झळकवणाऱ्या बॅटर्सच्या यादीत ख्रिस गेल सर्वात अव्वलस्थानी आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत २२ शतके झळकावल्याचा रेकॉर्ड आहे.

# भाजयुमो प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांची टीआयपीएल सीजन ३ क्रिकेट स्पर्धेला भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोणत्याही खेळाडूच्या प्रगतीसाठी आणि त्याच्या कौशल्याला वाव मिळण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक असते. पनवेलमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी तरुणांची ही गरज ओळखून त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, असे गौरवोद्गार भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी काढले. पनवेल येथील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात आयोजित क्रिकेट स्पर्धेला भेट दिली असता त्यांनी हे प्रतिपादन केले.

सोसायटी क्रिकेट क्लबच्या वतीने १९ वर्षांखालील गटासाठी टीआयपीएल सीजन ३ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने मैदानावर उपस्थित राहून कृष्णराज महाडिक आणि पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांनी खेळाडूंचा उत्साह वाढवला आणि तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महाडिक यांनी क्रिकेट खेळण्याचा आनंदही लुटला.

यावेळी पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, नगरसेवक सुमित झुंजारराव, गणेश कडू, नगरसेविका शिवानी घरत, अस्मिता घरत, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद दवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष मयूर कदम, हिमेश बहिरा, रवी सोळंखी, दिनेश जैन आदित्य देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# पाकिस्तानी क्रिकेटर मोहम्मद नवाझची ड्रग्स चाचणी पॉझिटिव्ह

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानी क्रिकेटपटू मोहम्मद नवाझची ड्रग्ज चाचणी म्हणजेच अमली पदार्थ सेवनाची चाचणी पॉझिटिव्ह आल्याने तो पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी)च्या रडारवर आला आहे. ईएसपीएनक्रिकइन्फोने दिलेल्या वृत्तानुसार पीसीबी या प्रकरणाची चौकशी करणार आहे. यामुळे इंग्लंडमधील टी-२० ब्लास्टसाठी सरे संघात सामील होण्याचा नवाझचा करार रद्द करण्यात आला आहे.

या वर्षीच्या टी-२० विश्वचषकादरम्यान मोहम्मद नवाझची ड्रग्ज चाचणी पॉझिटिव्ह आली होती. ३२ वर्षीय नवाझने श्रीलंकेतील पाकिस्तानच्या सर्व सामन्यांमध्ये भाग घेतला होता. २०२६च्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ फेरीतून पाकिस्तान संघ बाहेर पडला, जिथे त्याने १५ धावा केल्या आणि सात बळी घेतले.

मोहम्मद नवाझने नुकताच सरेसोबत एक करार केला होता. २६ मे ते १८ जुलैदरम्यान होणाऱ्या संपूर्ण टी-२० ब्लास्ट हंगामासाठी तो काउंटी संघाकरिता उपलब्ध होणार होता. पीसीबीने अवघ्या दोन आठवड्यांपूर्वीच नवाझला त्यासाठी ना हरकत प्रमाणपत्रदेखील दिले होते. तथापि, आता असे वृत्त आहे की, पीसीबीने नवाझची चौकशी केल्यानंतर त्याचा सरेसोबतचा करार रद्द करण्यात आला आहे, मात्र सरेने अद्याप या प्रकरणी कोणतेही निवेदन जारी केलेले नाही.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com